(श्रीमत्पूज्यपादस्वामिकृत)

उपासकाचार.

हें पुस्तक

कल्लापा भरमापा निटवे

नांद्रणीकर यांणीं

कोल्हापूर येथें

आपल्या जैनेंद्र छापखान्यांत छापिलें.

शके १८२६.] [किं० ८ आ [सन १९०४.

॥ श्रीः ॥

श्रीमत्पूज्यपादस्वामिकृत

उपासकाचारः

श्रीमज्जिनेन्द्रचन्द्रस्य ।
सान्द्रवाक्चन्द्रिकाऽङ्गिनाम् ॥
हृषीष्ट दुष्टकर्माष्ट- ।
घर्मसन्तापनापहा ॥ १ ॥

आर्या.

श्रीमज्जिनचंद्राची । वाणी घनचंद्रिका जना सुखवी ॥
दुष्कर्माष्टकरूपी । उष्म्याचा ताप जी सदां निववी ॥ १ ॥

अर्थ— आठ दुष्टकर्मरूपी उष्म्यापासून झालेल्या संतापाला नाहींसा करणारी श्रीजिनेंद्राची वाणीरूप निविड (दाट) चंद्रिका जीवांस संतुष्ट करो.

दुराचारतयाऽऽक्रान्त ।

दुःखसन्दोहशान्तये ॥
ब्रवीम्युपासकाचारं ।
चारुमुक्तिसुखप्रदम् ॥ २ ॥

शालिनी.

दुराचारें व्यापलें दुःखजाल ।
त्याच्या नाशाकारणें मी, विशाल ।
जेणें यई मुक्तिचें सौख्य हातां ।
ऐसा सांगे श्रावकाचार आतां ॥ २ ॥

अर्थ—दुराचाराच्या योगानें व्यापलेल्या दुःखसमुदायाला शांत करण्याकरितां सुंदर असें मोक्ष सुख देणारा उपासकाचार सांगतो.

आप्तोऽष्टादशभिर्दोषै ।
र्निर्मुक्तः शान्तरूपवान् ॥
निर्ग्रन्थः स्यात्तपस्वी च ।
धर्मो हिंसादिवर्जितः ॥ ३ ॥

आर्या.

अष्टादश दोषांनीं। रहित असा शांतरूप जो आप्त ॥
निर्ग्रंथ तो तपस्वी। धर्म अहिंसा गणा स्वचित्तांत ॥ ३ ॥

अर्थ-- अठरा दोषांनीं रहित आणि शांतरूप असा जो देव तो आप्त होय. परिग्रहरहित जो आहे तो मुनि होय आणि हिंसादि पातकांनीं रहित असा तो धर्म होय.

क्षुधा तृषा भयं द्वेषो।
रागो मोहश्च चिन्तनम् ॥
जरा रुजा च मृत्युश्च।
स्वेदः खेदो मदो रतिः ॥ ४ ॥
विस्मयो जननं निद्रा।
विषादोऽष्टादश ध्रुवः ॥
त्रिजगत्सर्वभूतानां।
दोषाः साधारणा इमे ॥ ५ ॥
एतैर्दोषैर्विनिर्मुक्तः।
सोऽयमाप्तो निरञ्जनः ॥

विद्यन्ते येषु ते नित्यं ।
तेऽत्र संसारिणः स्मृताः ॥ ६ ॥

शार्दूलविक्रीडित.

राग द्वेष जरा क्षुधा रति तृषा चिंता रुजा विस्मय ।
निद्रा घर्म विषाद खेद मद मृत्यू जन्म मूर्च्छा भय ।
हे असती अठराहि दोष त्रिजगीं जीवांस साधारण ।
संसारी जन यांहिं बद्ध न दुजा त्या मुक्त आप्ताविण ४

अर्थ-- भूक, तहान, भय, द्वेष, राग (विषयप्रीति) मोह, चिंता, जरा, रोग, मृत्यु, स्वेद (घाम) खेद, (दैन्य) मद, रति, विस्मय, जन्म, निद्रा, विषाद (वाईट वाटणें) हे अठरा दोष तिन्हीं जगांतील सर्व जीवाला साधारण आहेत. ह्या अठरा दोषांनीं जो मुक्त झाला तो हा निरंजन आप्त होय. हे दोष ज्यांच्या ठिकाणीं आहेत ते संसारी जीव होत.

पूर्वापरविरोधादि ।

दूरं हिंसाद्यपासनम् ॥
प्रमाणद्वयसंवादि ।
शास्त्रं सर्वज्ञभाषितम् ॥ ७ ॥

ओंवी.

पूर्वापरविरोधरहित । हिंसादिकृत्यांपासुनी मुक्त ॥
प्रत्यक्ष परोक्ष प्रमाणें सांगत । तें जिनोक्त शास्त्र होय १

अर्थः- पूर्वापर विरोधरहित, हिंसादिकृत्यांपासून दूर करणारें, प्रत्यक्ष आणि परोक्ष हीं दोन प्रमाणें सांगणारें आणि सर्वज्ञ जिनेश्वरानें सांगितलेलें असें जें तें शास्त्र होय.

एतेषु निश्चयो यस्य ।
विद्यते स पुमानिह ॥
सम्यग्दृष्टिरिति ज्ञेयो ।
मिथ्यादृक्तेषु संशयी ॥ ८ ॥

भुजंगप्रयात.

जिनातें गुरूतें तसें आगमातें ।

सुधर्माप्रती निश्चयें सेविती ते ॥
सुदृष्टी म्हणा, जो धरी संशयाला ।
कुदृष्टी असें नाम आहे तयाला ॥ ६ ॥

अर्थ:- वरील देव, गुरु, धर्म व शास्त्र यांच्या ठिकाणीं ज्याचा दृढनिश्चय आहे तो मनुष्य सम्यग्दृष्टि समजावा आणि त्यांच्याविषयीं ज्याला संशय आहे तो मिथ्यादृष्टि समजावा.

स्वतत्त्वपरतत्त्वेषु ।
हेयोपादेयनिश्चयः ॥
संशयादिविनिर्मुक्तः ।
स सम्यग्दृष्टिरुच्यते ॥ ९ ॥

शालिनी.

ज्याला वाटे ग्राह्य आहे स्वधर्म ।
आणी तैसा त्याज्य मानी अधर्म ॥
नाहीं बाधा संशयाची भ्रमाची ।
जाणा सम्यग्दृष्टि की होय तोची ॥ ७ ॥

अर्थ— ज्याला स्वधर्माविषयीं ग्राह्यबुद्धि आहे आणि मिथ्याधर्माविषयीं त्याज्यबुद्धि आहे आणि जो संशय व विभ्रमानें रहित आहे तो सम्यग्दृष्टि समजावा.

गोपुच्छिकश्वेतवासा ।
द्राविडो यापनीयकः ॥
निष्पिच्छश्चेति पञ्चैते ।
जैनाभासाः प्रकीर्तिताः ॥ १० ॥

आर्या.

श्वेतांबर गोपुच्छिक । द्राविड निष्पिच्छ यापनीयक हे ॥
जैनासमान दिसती । परि जैन नव्हेत सत्य हें पाहे ८

अर्थः- गोपुच्छिक, श्वेतांबर, द्राविड, यापनीयक आणि निष्पिच्छ हे पांच पंथ जैनाभास ह्मणजे जैनासारखे दिसणारे आहेत. जैन नव्हेत.

नास्त्यर्हतः परो देवो ।
धर्मो नास्ति दयां विना ॥

तपः परं च नैर्ग्रंथ्य- ।
मेतत्सम्यक्त्वलक्षणं ॥ ११ ॥

उपजाति.

जिनाविणें देव दुजा नसेच । दयेविना धर्म नसोचि साच ॥
निर्ग्रंथता हें तप मानिताहे । सद्दृष्टिचें लक्षण हेंच आहे

अर्थ— अर्हत् परमेश्वरावांचून दुसरा देव नाहीं. दयेवांचून धर्म नाहीं आणि निर्ग्रंथपणा हेंच उत्तम तप आहे, असें मानणें हेंच सम्यक्त्वाचें लक्षण आहे.

अधिष्ठानं भवेन्मूलं ।
प्रासादानां यथा पुनः ॥
तथा सर्वव्रतानां च ।
मूलं सम्यक्त्वमुच्यते ॥ १२ ॥

भुजंगप्रयात.

गृहाला अधिष्ठान आधार जैसें ।
असे सद्व्रतालागि सम्यक्त्व तैसें ।

जिनें बोधिलें भव्यजीवांस ऐसें ।
न मानी तया सौख्य होईल कैसें ॥ १० ॥

अर्थ— घराला पाया हा जसा आधार आहे, त्याप्रमाणें सर्व व्रतांना सम्यक्त्व हा आधार आहे, असें सांगितलें आहे.

अव्रता अपि सम्यक्त्वे ।
ये दृढा न प्रयान्ति ते ॥
स्त्रीनपुंसकतिर्यक्त्वं ।
नारकत्वं दरिद्रताम् ॥ १३ ॥

आर्या.

व्रतहीन जरी असला । दृढसम्यक्त्वी मरोनिया पुढती ॥
स्त्री क्लीब पशु दरिद्री । नच होई आणि त्या न नरकगती ॥

अर्थः— जे दृढ सम्यक्त्वी आहेत ते व्रतहीन असले तरी स्त्री, नपुंसक, पशु आणि दरिद्री होऊन जन्मत नाहींत आणि नरकालाही जात नाहींत.

मद्यमांसमधुत्यागैः ॥

महोदुम्बरपञ्चकैः ॥
गृहिणां प्राहुराचार्या ।
अष्टौ मूलगुणानिति ॥ १४ ॥

आर्या.

मधु मांस मद्य आणिक । पंचोदुंबर कधीं न सेवावे ॥
श्रावक मूलगुणाष्टक । कथिती आचार्य त्यांस पाळावें ॥

अर्थः— मद्य, मांस, मधु आणि पांच प्रकारचीं उदुंबरें ह्यांचा त्याग करणें हे गृहस्थांचे आठ मूलगुण आचार्यांनीं सांगितले आहेत.

मांसाशिषु दया नास्ति ।
न सत्यं मद्यपायिषु ॥
धर्मभावो न जीवेषु ।
मधूदुम्बरसेविषु ॥ १५ ॥

उपजाति.

जो मांस भक्षी न दया तयाला ।
न सत्य माना कधिं मद्यपाला ॥

उदुंबरां आणि मद्यास भक्षी ।
त्याच्या नये धर्म कधींच लक्षीं ॥ १३ ॥

अर्थः-- मांस खाणाऱ्याला दया नाहीं, मद्य पिणाऱ्याच्या अंगीं खरेपणा असत नाहीं आणि मध व उदुंबरें खाणाऱ्याला धर्मभावना असत नाहीं.

चित्ते भ्रान्तिर्जायते मद्यपानात् ।
भ्रान्तं चित्तं पापचर्यामुपैति ॥
पापं कृत्वा दुर्गतिं यान्ति मूढा- ।
स्तस्मान्मद्यं नैव देयं न पेयम् ॥ १६ ॥

शार्दूलविक्रीडित.

मद्य प्राशन जो करी नर तया चित्तास भ्रांती पडे ।
चित्तभ्रांत ह्मणूनि पाप सहजीं त्याच्या करीं तें घडे ।
पापें फार करूनि मूर्ख पुढतीं कीं जातसे दुर्गती ।
सेवावी न सुरा स्वयें परकिया सेवावया द्या न ती ॥ १४ ॥

अर्थः— मद्यपानाच्या योगानें चित्तांत भ्रांति

उत्पन्न होते. भ्रांत झालेलें चित्त पाप करण्याला प्रवृत्त होतें. मूर्खलोक पाप करून दुर्गतीस जातात; म्हणून मद्य पिऊं नये व पिण्यास देऊं नये.

न वेत्ति मद्यपानतः ।
स्मरेण विह्वलीकृतः ।
स्वमातरं स्वयोषिता ।
समानमेव मन्यते ॥
विवेकबुद्धिहीनतः ।
करोति देहिनां वधम् ॥
ततो विवेकिभिर्जनैः ।
सुरा निषिध्यते सदा ॥ १७ ॥

शार्दूलविक्रीडित.

झालेला नर मद्यपान करुनी दर्पे बहू विह्वल ।
मातेलाच गणी कलत्र ह्मणूनी ज्ञानांध तो दुर्बळ ।
होई भ्रष्ट विवेक बुद्धि मग जीवांच्या वधातें करी ।
हें जाणूनि कधीं विवेकिजन तो मद्या न त्या आदरी १९

अर्थः— मद्यपान करून मदानें विव्हळ झालेला मनुष्य आईलाच बायको समजतो व विवेक आणि बुद्धि भ्रष्ट झाल्यामुळें प्राण्यांचा वध करतो; ह्मणून विवेकी लोकांकडून सदोदित मद्याचा निषेध केला जातो.

प्राणिनां देहजं मांसं ।
तद्विघातं विना न तत् ॥
प्राप्यते कारणात्तस्मा-।
द्वर्जयेन्मांसभक्षणम् ॥ १८ ॥

आर्या.

प्राण्यांच्या देहांतुनि । लागतसे मांसखंड काढावें ॥
तें वध करण्यावांचुनि । न मिळे यास्तव तया न सेवावें १९

अर्थः— मांस हें प्राण्यांच्या देहापासून निघतें. तें त्याचा वध केल्याशिवाय मिळत नाहीं; ह्मणून मांस भक्षण वर्ज करावें.

रक्तमात्रप्रवाहेण ।

स्त्री निन्द्या जायते स्फुटम् ॥
द्विधातुजं पुनर्मांसं ।
पवित्रं जायते कथम् ॥ १९ ॥

आर्या.

बहु निंद्य मानिलें कीं । स्त्रीस रजोदर्शनामुळें पाही ॥
तेव्हां शोणित शुक्रोद्भव । मांस पवित्र कवि तें होई ॥ १७ ॥

अर्थः-- रजोदर्शनामुळें स्त्री निंद्य मानिली आहे; तेव्हां शुक्रशोणितापासून उत्पन्न झालेलें मांस कसें पवित्र होईल ?

माक्षिकं जन्तुसङ्कीर्णं ।
मधुजालविघाततः ॥
तज्जायतेऽङ्गिरक्षार्थं ।
तस्मात्तत्त्यज्यते बुधैः ॥ २० ॥

आर्या.

मध एका जातीच्या । कीटकसंघें भरोनिया असतें ॥
तज्जालच्छेदाविण । न मिळे पंडित ह्मणूनि वर्जित तें ॥ १८ ॥

अर्थः--- मध हें एका प्रकारच्या किड्यांनीं भरलेलें असतें. तें मधाचें जाळें तोडल्यावांचून मध मिळत नाहीं; ह्मणून जीवरक्षणाकरितां पंडित लोक त्याचा त्याग करतात.

स्थूलाः सूक्ष्मास्तथा जीवाः ।
सन्त्युदुम्बरमध्यगाः ॥
तन्निमित्तं जिनोद्दिष्टं ।
पञ्चोदुम्बरवर्जनम् ॥ २१ ॥

स्वागता.

स्थूल सूक्ष्म असे बहुतांपरी । जीवसंघ वसतो उदुंबरीं ॥
ह्मणुनि पांच उदुंबर यांचा । त्याग बोलत असे जिनवाचा ॥

अर्थः-- उदुंबरांत स्थूल व सूक्ष्म असे पुष्कळ जीव असतात; त्याकरितां पांच उदुंबरांचा त्याग करावा असें जिनांनी सांगितलें आहे.

अणुव्रतानि पञ्चैव ।
त्रिःप्रकारं गुणव्रतम् ॥

शिक्षाव्रतानि चत्वारि ।
इत्येतद्द्वादशात्मकम् ॥ २२ ॥

ओंवी.

अणुव्रताचे पांच प्रकार । गुणव्रताचे तीन साचार ॥
शिक्षाव्रतें असती चार । बाराव्रतें हीं गृहस्थां ॥ २० ॥

अर्थ.... अणुव्रतें पांच आहेत, गुणव्रतें तीन आहेत आणि शिक्षाव्रतें चार आहेत. याप्रमाणें गृहस्थाचीं बाराव्रतें आहेत.

देवतामन्त्रसिध्यर्थं ।
पर्वण्यौषधिकारणात् ॥
न भवन्त्यङ्गिनो हिंस्याः ।
प्रथमं तदणुव्रतम् ॥ २३ ॥

शार्दूलविक्रीडित.

देवातें बळि द्यावयास अथवा सिध्यर्थ मंत्राचिया ।
किंवा कारण पर्वकाल करुनी भैषज्य साधावया ॥
जीवांचा वध तो कधीं न करणें ती धर्मबाह्यकृति ।

यालागीं पहिलें अणुव्रत असें ज्ञाते सदा बोलती ॥ २१ ॥

अर्थः– देवाला बळी देण्याकरितां, मंत्र सिद्ध करण्याकरितां, पर्वकालानिमित्त व औषधाकरितांही जीवांचा वध करूं नये. हें पहिलें अणुव्रत होय.

लाभलोभभयद्वेषै- ।
र्व्यलीकवचनं पुनः ॥
सर्वदा तन्न वक्तव्यं ।
द्वितीयं तदणुव्रतम् ॥ २४ ॥

उपजाति.

लाभार्थ लोभार्थ भयेंकरोनी । कीं द्वेष इत्यादिक कारणांनीं ॥
कधीं न खोटें वदण्यांत यावें । अणुव्रता या दुसरें ह्मणावें ॥

अर्थः– लाभ, लोभ, भय व द्वेष इत्यादि कारणांनींही केव्हांही खोटें बोलूं नये. हें दुसरें अणुव्रत होय.

पतितं विस्मृतं नष्ट- ।

मुत्पथे पथि कानने ॥
वर्जनीयं परद्रव्यं ।
तृतीयं तदणुव्रतम् ॥ २५ ॥

ओंवी.

मार्गीं आडमार्गीं वनीं । पडलेलें राहे विसरुनी ॥
हरवलेलें परस्व घेउनी ; न जाणें तिसरें अणुव्रत ॥२३॥

अर्थः-- मार्गांत किंवा आडमार्गांत अथवा रानांत इत्यादि ठिकाणीं पडलेलें, विसरलेलें, हरवलेलें असें परद्रव्य घेऊं नये. हें तिसरें अणुव्रत होय.

परेषां योषितो दृष्ट्वा ।
निजमातृसुतासमाः ॥
कृत्वा स्वदारसन्तोषं ।
चतुर्थं तदणुव्रतम् ॥ २६ ॥

उपजाति.

अन्यस्त्रिया पाहुनियां मनांत ।

कन्या स्वतांची जननी गणीत ।
स्वदारसंतोष तया ह्मणावें ।
अणुव्रता या चवथें गणावें ॥ २४ ॥

अर्थः– दुसऱ्यांच्या बायकांना पाहून आपल्या आई मुलीप्रमाणें मानून स्वस्त्रीच्या ठिकाणीं संतुष्ट असणें हें चवथें अणुव्रत होय.

दासीदासरथान्येषां ।
स्वर्णानां योषितां तथा ॥
परिमाणव्रतं ग्राह्यं ।
पञ्चमं तदणुव्रतम् ॥ २७ ॥

आर्या.

दासीदासरथांची । स्त्री हेमादिक पदार्थ यांची ती ॥
करुनि इयत्ता असणें । अणुव्रता पांचवें तया ह्मणती २९

अर्थः– दासी, दास, रथ, सुवर्ण व स्त्रिया इत्यादिकांच्या संग्रहाची इयत्ता करणें, हें पांचवें अणुव्रत होय.

परिमाणव्रतं ग्राह्यं ।
दिक्षु सर्वासु सर्वदा ॥
स्वशक्त्याऽऽमगुरोः पार्श्वे ।
तदाद्यं स्याद्गुणव्रतम् ॥ २८ ॥

आर्या.

मर्यादित सर्व दिशा । करुनि पलिकडे कधीं न जायाचें ॥
व्रत गुरुजवळीं घेणें । प्रथम गुणव्रत तया ह्मणा साचें २६

अर्थः— सगळ्या दिशांच्या मर्यादा करून आपल्या शक्तीप्रमाणें पलिकडे न जाण्याचें व्रत गुरूजवळ घेणें हें पहिलें गुणव्रत होय.

इयन्तीं क्ष्मां गमिष्यामि ।
कृतसंख्यां दिशं तथा ॥
इत्युक्त्वा गम्यते यत्तत् ।
द्वितीयं स्याद्गुणव्रतम् ॥ २९ ॥

आर्या.

मर्यादित आशेंतहि । मर्यादा अमुक एक देशातें ॥

करुनी गमनीं निश्चय । वागे तद्वत् दुजें गुणव्रत तें ॥२७॥

अर्थः- मर्यादित दिशेंतही अमुक एका भूमीपर्यंतच गमन करीन अशी प्रतिज्ञा करून तसें वागणें हें दुसरें गुणव्रत होय.

पाशमण्डलमार्जार- ।
विषशस्त्रकृशानवः ॥
न पापं च अमी देया ।
स्तृतीयं स्याद्गुणव्रतम् ॥ ३० ॥

ओंव्या.

बाळगूं नये मार्जार । फास जाळें विष शस्त्र ॥
अग्नि इत्यादि पापाचार । करावयाचीं साधनें ॥ २८ ॥
अथवा नाना हिंसकजीवां । जवळीं थारा कधीं न द्यावा ॥
त्यांचा व्यवसायही न करावा । हेंचि तिसरें गुणव्रत ॥२९॥

अर्थः- मांजर न बाळगणें, फांस, जाळें, विष, शस्त्र, अग्नि, हीं पापाचीं साधनें न देणें (व यांचा व्यापारही न करणें) हें तिसरें गुणव्रत होय. (मां-

जर न बाळगणें याचा उपलक्षणानें असा अर्थ आहे कीं, हिंसक जनावरें न बाळगणें.

आर्तरौद्रं परित्यज्य ।
त्रिषु कालेषु सर्वदा ॥
वन्द्यो भवति सर्वज्ञ- ।
स्तच्छिक्षाव्रतमाद्यजम् ॥ ३१ ॥

आर्या.

आर्तध्याना तद्वत् । रौद्रध्याना त्यजोनि आसातें ॥
नित्य त्रिकाळ नमणें । शिक्षाव्रत जाण सत्य पहिलें तें ३०

अर्थः— आर्तध्यान व रौद्रध्यान सोडून देऊन नित्य त्रिकाळीं वीतरागास वंदन करणें; हें पहिलें शिक्षाव्रत होय.

चतुर्दश्यामथाष्टम्यां ।
प्रोषधः क्रियते सदा ॥
शिक्षाव्रतं द्वितीयं स्या- ।
न्मुनिमार्गविधानतः ॥ ३२ ॥

ओंवी

प्रत्येक चतुर्दशी अष्टमीस । अनुसरोनी मुनिधर्मास ॥
करणें जो प्रोषधोपवास । द्वितीय शिक्षाव्रत तेंची ॥२१॥

अर्थः- दर चतुर्दशी व अष्टमीला मुनिधर्मा-प्रमाणें प्रोषधोपवास करणें; हें दुसरें शिक्षाव्रत होय.

यानभूषणमाल्यानां ।
ताम्बूलाहारवाससाम् ॥
परिमाणं भवेद्यत्त- ।
त्प्राहुः शिक्षाव्रतं बुधाः ॥ ३२ ॥

आर्या.

वाहन भूषण माळा । तांबूलाहार वस्त्र वस्तूंचें ॥
करणें परिमाणाचि जें । शिक्षाव्रत तें असें तिजें साचें३२

अर्थः— यान, (मेणा, पालखी वगैरे) भूषण, माल्य, (फुलांच्या माळा) तांबूल, आहार, वस्त्र इत्यादि भोगोपभोगाच्या पदार्थांची इयत्ता करणें; हें तिसरें शिक्षाव्रत होय.

संविभागोऽतिथीनां च ।
कर्तव्यो निजशक्तितः ॥
स्वेनोपार्जितवित्तस्य ।
तच्छिक्षाव्रतमन्त्यजम् ॥ ३४ ॥

उपजाति.

न्यायें स्वसंपादित वित्त जें तें ।
स्वशक्तिनें नित्य अतीथि यातें ।
सद्दान द्यायास विभागवावें ।
चतुर्थ शिक्षाव्रत हें ह्मणावें ॥ ३२ ॥

अर्थः– आपण न्यायानें मिळविलेल्या द्रव्यांतून आपल्या शक्तीप्रमाणें दररोज अतिथीकरितां कांहीं भाग काढून ठेवणें; हें चवथें शिक्षाव्रत होय.

गुणव्रतं त्रिधा प्रोक्तं ।
शिक्षाव्रतचतुष्टयम् ॥
शीलसप्तकमित्येत- ।
द्भाषितं मुनिपुङ्गवैः ॥ ३५ ॥

आर्या.

तिनहि गुणव्रतें तीं । चारहि शिक्षाव्रतें जिनें कथिलीं ॥
यां शीलसप्तक अशी । मिळवुनि संज्ञा मुनीश्वरें दिधली॥

अर्थः— तीन गुणव्रतें सांगितलीं आहेत आणि चार शिक्षाव्रतें सांगितलीं आहेत, तीं मिळून त्यांना "शीलसप्तक,, असें नांव मुनींनीं दिलें आहे.

अणुव्रतानि यः पाति ।
शीलसप्तकमप्यसौ ॥
व्रतिकः प्रोच्यते विद्भिः ।
सप्तव्यसनवर्जितः ॥ ३६ ॥

आर्या.

सप्तव्यसनें त्यागुनि । अणुव्रतां शीलसप्तका पाळा ॥
व्रतिक श्रावक तोची । पापाच्या पर्वतासही जाळीं ॥१९॥

अर्थः— सात व्यसनें ज्यानें सोडलीं आहेत आणि नंतर अणुव्रतें व शीलसप्तक पाळणारा जो गृहस्थ आहे तो व्रती श्रावक समजावा.

द्यूतं मांसं सुरा वेश्या ।
परदाराभिलोभनम् ॥
मृगया सह चौर्येण ।
स्युः सप्त व्यसनानि वै ॥ ३७ ॥

शालिनी.

द्यूतक्रीडा आणि मांसास खाणें ।
वेश्यास्त्रीची संगती, मद्य पीणें ।
इच्छा अन्यस्त्रीवरी, की शिकारी, ।
चौर्य, व्यसनें सात हीं होत सारीं ॥ ३६ ॥

अर्थः— द्यूत (जुगार खेळणें) मांस खाणें, सुरा पीणें, वेश्यासंग करणें, परस्त्रीची इच्छा करणें शिकार करणें आणि चोरी करणें हीं सात व्यसनें होत.

शृङ्गवेरं तथाऽनङ्ग- ।
क्रीडां विल्वफलं सदा ॥
पुष्पशाकं च सन्धानं ।

नवनीतं च वर्जयेत् ॥ ३८ ॥

आर्या.

आलें बेल फुलें कीं । ओली भाजी पदार्थ मादक ते ॥
लोणी हीं त्यागावीं । न करावें कधिं अनंगक्रीडेतें ३७

अर्थः— आलें, बेल, फुलें, ओली भाजी मादक पदार्थ, लोणी ह्या पदार्थांचा त्याग करावा व अनंगक्रीडा (कामसेवनाच्या इंद्रियावांचून इतर ठिकाणीं क्रीडा) करूं नये.

मांसरक्तार्द्रचर्मास्थि- ।
पूयदर्शनतस्त्यजेत् ॥
मृताङ्गिवीक्षणादन्नं ।
प्रत्याख्यानान्नसेवनात् ॥ ३९ ॥

ओंवी.

मांस शोणित ओलें कातडें । अस्थीं पू अथवा मडें ।
त्यागिला पदार्थ दृष्टिस पडे । तरि तत्काल भोजन त्यागावें

अर्थः— मांस, रक्त, ओलें कातडें, हाड, पू,

मद्दें हीं दृष्टीस पडलीं असतांना आणि त्याचप्रमाणें त्याग केलेला पदार्थ भोजनांत आला असतां तत्काळचें भोजन सोडावें.

मौनं भोजनवेलायां ।
ज्ञानस्य विनयो भवेत् ॥
रक्षणं चाभिमानस्ये- ।
त्युद्दिशन्ति मुनीश्वराः ॥ ४० ॥

आर्या.

भोजनकालीं मौना । धरिल्यानें विनय होत ज्ञानाचा ॥
पोक्तपणाचें रक्षण । होतें, उपदेश हा असे मुनिंचा ३९

अर्थः- भोजनकालीं मौन धरल्यानें ज्ञानाचा विनय होतो आणि अभिमानाचें रक्षणही होतें, असें मुनीश्वरांनीं सांगितलें आहे.

अक्षरैर्न विना शब्दा- ।
स्तेऽपि ज्ञानप्रकाशकाः ॥
तद्रक्षार्थं च षट्स्थाने ।

मौनं श्रीजिनभाषितम् ॥ ४१ ॥

श्लोक.

नसे अक्षरावांचुनी शब्द होत ।
तसा शब्द तो ज्ञान हें दाखवीत ॥
धरा ज्ञानरक्षार्थ षट्स्थानिं मौन ।
जिनाज्ञा अशी चित्तिं तूं सत्य मान ॥ ४० ॥

अर्थः— अक्षरांवांचून शब्द होत नाहींत. शब्द हे ज्ञानाचे द्योतक आहेत. ह्मणुन ज्ञानरक्षणाकरितां सहा ठिकाणीं मौन धरावें, असें जिनांनीं सांगितलें आहे.

धर्मं चतुर्विधं प्राहु- ।
र्दानपूजादिभेदतः ॥
तच्चान्नाभयभैषज्य- ।
शास्त्रदानप्रभेदतः ॥ ४२ ॥

आर्या.

पूजादानादिक ते । धर्म चतुर्विध गृहस्थ लोकांचे ॥

आहार अभय औषध । शास्त्र असे चार भेद दानाचे ४१

अर्थः— दान पूजा वगैरे भेदानें गृहस्थधर्म चार प्रकारचा सांगितला आहे. पैकीं दान हें अन्न, अभय, भैषज्य आणि शास्त्र अशा भेदांनीं चार प्रकारचें आहे.

अन्नदानं द्विधा प्रोक्तं ।
पात्रापात्रविभेदतः ॥
त्रिधा भवति तत्पात्र- ।
मुत्तमादिप्रभेदतः ॥ ४३ ॥

आर्या.

पात्र अपात्र मिळोनी । भेदद्वय जाण अन्नदानाचें ॥
त्यांतुनि उत्तम मध्यम । कनिष्ठ हे असति भेद पात्राचे ॥

अर्थः— पात्रदान व अपात्रदान अशा भेदानें अन्नदान हें दोन प्रकारचें आहे. पात्र हें उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन प्रकारच्या भेदाचें आहे.

महाव्रतानि यः पञ्च ।
बिभर्त्यत्र सुसँयमः ॥
निष्कषायो जितानङ्गः ।
स भवेत्पात्रमुत्तमम् ॥ ४४ ॥
यः समः सर्वसत्त्वेषु ।
स्वाध्यायध्यानतत्परः ॥
निर्मुक्तः सर्वसङ्गेभ्य- ।
स्तमाहुः पात्रमुत्तमम् ॥ ४५ ॥

शार्दूलवि०

पाळी पांच महाव्रतें अणिकही जो संयमीं उत्तम ।
जिंकी मन्मथ ज्या कषाय न, बघी सर्वत्र जीवां सम ॥
स्वाध्यायांत तसाचि तत्पर असे, ध्यानांत जो सर्वही ।
संगापासुनि मुक्त होय मुनि तो सत्पात्र जाणा तुह्मी ॥४२॥

अर्थः— जो पांच महाव्रतें पाळितो, ज्याचें संयम चांगलें आहेत, ज्याला कषाय नाहींत, ज्यानें मन्मथास जिंकलें आहे, सर्व जीवांच्या ठिकाणीं

ज्याची समता आहे, जो स्वाध्याय आणि ध्यान ह्यांत तत्पर असून सर्व संगापासून मुक्त असतो असा जो मुनि त्याला उत्तमपात्र ह्मणतात.

सम्यक्त्वव्रतसम्पन्नो ।
जिनधर्मप्रकाशकः ॥
मध्यमं पात्रमित्याहु- ।
र्विरता निरतं बुधाः ॥ ४८ ॥

आर्या.

सद्दर्शनपूर्वक तीं । पाळितसे नित्य जो व्रतें विविध ॥
धर्मप्रभावना करि । तो मध्यमपात्र सांगती विबुध ॥ ४४ ॥

अर्थ— सम्यक्त्वसहित व्रतें पाळणारा व जिनधर्माची प्रसिद्धि करणारा असा जो श्रावक तो मध्यपात्र होय, असें पंडितांनीं सांगितलें आहे.

केवलं यस्य सम्यक्त्वं ।
विद्यते न पुनर्व्रतम् ॥
तज्जघन्यमिति प्राहुः ।

पात्रं निर्मलबुद्धयः ॥ ४७ ॥

आर्या.

ज्या सम्यक्त्वच आहे । परि ज्याला कोणतेंच व्रत नाहीं ॥
त्या पात्र जघन्य असें । सांगितलें शास्त्रबुद्धिवंतांहीं ॥४९॥

अर्थः— ज्याला फक्त सम्यक्त्वच आहे. व्रत कोणतेंच नाहीं, तो जघन्यपात्र असें बुद्धिवंतांनीं सांगितलें आहे.

व्रतसम्यक्त्वनिर्मुक्तो ।
रागद्वेषसमन्वितः ॥
सोऽपात्रं भण्यते जैनै- ।
र्यो मिथ्यात्वपटावृतः ॥ ४८ ॥

भुजंगप्र०

व्रतें दर्शनें शून्य जो रागयुक्त ।
तसा द्वेषयोगें कलंकीत चित्त ॥
तया जाण मिथ्यात्वयुक्ता अपात्र ।
असें सांगते ती जिनोक्ती पवित्र ॥ ४६ ॥

अर्थः— व्रत आणि सम्यक्त्व हीं ज्याला नसून

जो रागद्वेषांनीं युक्त असा मिथ्यादृष्टि असतो तो अपात्र असें जैनाचार्यांनीं सांगितलें आहे.

उप्तं यथोषरक्षेत्रे ।
बीजं भवति निष्फलम् ॥
तथाऽपात्राय यद्दत्तं ।
निष्फलं तन्न संशयः ॥ ४९ ॥

आर्या.

क्षार अशी भूमी जी । पेरुनियां तींत बीज निष्फल तें ॥
तद्वत दान अपात्रीं । निःसंशय निष्फलत्व पावें तें ॥४७॥

अर्थः- खारट जमिनींत पेरलेलें बींज जसें निष्फल होतें तसें अपात्रीं दिलेलें दान निष्फल होतें यांत संशय नाहीं.

आमपात्रगतं क्षीरं ।
यथा नश्यति तत्समम् ॥
तथा तदप्यपात्रेण ।
समं नश्यति निश्चयः ॥ ५० ॥

आर्या.

कळके ऐशा पात्रीं । असलेलें दुग्ध नासुनी जातें ।
तद्वत पात्र नसे त्या । दिधलेलें दान व्यर्थ कीं होतें ४८

अर्थः— कळकणाऱ्या भांड्यांत ठेविलेले दूध जसें नासून जाते, त्याप्रमाणें अपात्रीं दिलेलें दानही व्यर्थ होतें.

जायते दन्दशूकस्य ।
दत्तं क्षीरं तथा विषम् ॥
तथाऽपात्राय यद्दत्तं ।
तद्विषं भोजनं भवेत् ॥ ५१ ॥

भुजंगप्र०

जरी पाजिलें पन्नगातें पयास ।
तरी तो वमे उग्र ऐशा विषास ॥
अपात्रीं तसें दान जें अर्पिती तें ।
विषासारिखें अंतिं दुःखास देतें ॥ ४९ ॥

अर्थः— सर्पाला दूध पाजविलें तरी त्याचें

जसें विष होतें, तसें अपात्रीं दिलेले अन्नही विष ह्मणजे परिणामीं दुःख देणारें होतें.

एकमेव जलं यद्व- ।
दिक्षौ मधुरतां व्रजेत् ॥
निम्बे कटुकतां तद्व- ।
त्पात्रापात्राय भोजनम् ॥ ५२ ॥

शार्दूलवि०

इक्षू निंब तरूंस पाजिति असे तें तोय हो एकची ॥
देतें गोड कडू रसास परि यामाजी न आश्चर्यची ॥
तैसें पात्र नरास दान दिधलें तें सौख्यकारी असें ॥
देतां तेंच आपात्र ठायिं मनुजा दुःखा बहू देतसे ॥९०॥

अर्थः-- एकच पाणी उंसाला पाजविल्यानें त्याचा रस गोड होतो आणि तेंच निंबाला पाजविल्यानें तो कडू रस देतो; त्याप्रमाणें पात्रास दिलेलें दान सुख देणारें व अपात्रीं दिलेलें दान दुःख देणारें असें होतें.

न्यग्रोधस्य यथा बीजं ।
स्तोकं सुक्षेत्रभूमिगम् ॥
बहुविस्तीर्णतां याति ।
तद्वदानं सुपात्रगम् ॥ ५३ ॥

भुजंगप्र०

बहू थाकटें बीज आहे वटाचें ॥
सुभूमींत तें पेरितां झाड त्याचें ॥
बने भव्य तैसेच सत्पात्रदान ॥
फला थोर दे अल्पही तें असोन ॥ ९१ ॥

अर्थः— वडाचें बीं अगदीं बारीक असतें तरी तें चांगल्या जमिनींत पेरल्यानें त्याचें उत्तम सांवलीचें मोठें झाड बनतें; त्याप्रमाणें सत्पात्रीं दिलेलें अल्पही दान महाफल देतें.

सौधर्मादिषु कल्पेषु ।
भुञ्जते स्वेप्सितं सुखम् ॥
मानवाः पात्रदानेन ।

मनोवाक्कायशुद्धितः ॥ ५४ ॥

आर्या.

मन वचन देह यांनें । शुद्ध करुनि दान दे सुपात्राला ॥
सौधर्मादिकस्वर्गी । जन्मुनि भोगीत इष्ट सौख्याला ॥ ५२

अर्थः— मन, वचन व देह हीं शुद्ध करून सत्पात्रीं दान देणारा मनुष्य सौधर्म वगैरे स्वर्गांत जन्म घेऊन आपल्या इच्छेस येईल तसें सुख भोगतो.

हंसतूलिकयोर्मध्ये ।
जीवः संक्रामते क्षणात ॥
कुमारोऽन्तर्मुहूर्तेन ।
भूत्वा षोडशवर्षगः ॥ ५५ ॥

उपजाति.

शय्या मराळासम शुभ्र तेथ ।
जन्मे क्षणें जीव पहा तयांत ॥
सोळाच वर्षे सुकुमार फार ।

अंतर्मुहूर्तांत दिसे कुमार ॥ ९३ ॥

अर्थः - तेथें हंसाप्रमाणें शुभ्र अशा बिछान्यांत हा जीव एका क्षणांत जाऊन जन्मतो आणि एका अंतर्मुहूर्तांत सोळा वर्षांचा कुमार दिसूं लागतो.

रत्ननिर्मितहर्म्येषु ।
दिव्यशय्यासु सर्वदा ॥
भुञ्जतेऽप्सरकन्याभिः ।
स्वयं स्वर्गेऽमराः सुखम् ॥ ५६ ॥

आर्या.

स्वर्गांतिल जे सुर ते । रत्नखचित मंदिरांत वसतात
अप्सरकन्यांसह सुख । सेविति ते मृदुल दिव्यशय्येंत

अर्थः- स्वर्गांतील देव रत्ननिर्मित मंदिरांत दिव्यशयनावर सर्वदा अप्सरकन्यासह सुख भोगतात.

दिव्यदेहप्रभावन्तः ।
सप्तधातुविवर्जिताः ॥

गर्भोत्पत्तिर्न तत्रास्ति ।
दिव्यदेहास्ततो मताः ॥ ५७ ॥ ५१

आर्या.

फांके प्रभा जयाची । आणिक जो रहित सप्तधातूंनीं ।
ज्या गर्भवास नाहीं । कथिला तो दिव्यदेह साधूंनीं ५९

अर्थः— ज्यांच्या देहाची प्रभा पसरली आहे आणि ज्यांचा देह सप्त धातूंनीं रहित आहे आणि ज्यांची उत्पत्ति गर्भापासून होत नाहीं; त्यांना दिव्यदेह ह्मणतात.

तस्मादत्रेत्य जायन्ते ।
चक्रिणो वाऽर्ध्दचक्रिणः ॥
इक्ष्वाक्वादिषु वंशेषु ।
पात्रदानबलान्नराः ॥ ५८ ॥

आर्या.

तेथुनि भूलोकातें । येउनि इक्ष्वाकु आदि वंशांत ॥
सत्पात्रदानयोगें । चक्री कीं अर्धचक्रि होतात ॥ ६६

अर्थ-- तेथून भूलोकीं येऊन इक्ष्वाकु वगैरे

चांगल्या वंशांत जन्म घेऊन चक्रवर्ती किंवा अर्धचक्रवर्ती होतात. हें पात्रदानाचें फळ आहे.

मिथ्यादृशोऽव्रता दानं ।
दत्वा पात्राय भुञ्जते ॥
दशाङ्गकल्पवृक्षेभ्यः ।
सत्सुखं भोगभूमिषु ॥ ५९ ॥

शार्दूलवि०

मिथ्यादृष्टि तसेचि अव्रत असे जे जीव तेही पहा ॥
जन्मा घेउनि भोगभूमित सुखें सत्पात्रदानीं महा ॥
होतें सौख्य दशांगकल्पतरुच्या पासोनि जें प्राप्त तें ।
स्वेच्छेनें बहुकाळ भोगुनि सुखें ते पावती तृप्तितें ॥५७॥

अर्थः— मिथ्यादृष्टि व अव्रती जीवहि पात्रदान देऊन भोगभूमींत जन्म पावून तेथें दशांगकल्पवृक्षांपासून इच्छित सौख्य भोगितात.

स्रग्वस्त्रपानतूर्याङ्गा ।
भूषणाहारगेहदाः ॥

ज्योतिर्भाजनदीपाङ्गा ।
दशाङ्गाः कल्पपादपाः ॥ ६० ॥

आर्या.

माळा वस्त्र सुपेयें । वाद्यें भूषण गृह प्रकाश तसे ॥
पात्रें सुदीप भोजन । असतात दशांग कल्पवृक्ष असे॥५८॥

अर्थः— माळा, वस्त्रें, पेय, तूर्य, (वाद्यें) भूषण, घर, ज्योति, (प्रकाश) पात्रें, दीप, भोजन हीं देणारे दहा प्रकारचे कल्पवृक्ष असतात.

केचित्कुपात्रदानेन ।
कर्णप्रावरणादिषु ॥
भोगभूमिषु कुत्सासु ॥
जायन्ते ते कुमानवाः ॥ ६१ ॥

आर्या.

कर्णेंद्रियादिकांनीं । वस्त्राभरणांहि हीन होवोनी ॥
जन्मे कुत्सित भूमिंत । जीव अपात्रास दान देवोनी॥५९॥

अर्थः- कुपात्रदानाच्या योगानें कर्ण वगैरे इंद्रि-

यांनीं व कांहीं वस्त्रालंकारांनीं हीन अशा कुत्सित भोगभूमींत कित्येक कुमानव जन्म घेतात.

विहाय कुत्सितं पात्रं ।
तस्मात्पात्रेषु योजयेत् ॥
आहारं भक्तिपूर्वेण ।
श्रद्धादिगुणसँयुतः ॥ ६२ ॥

आर्या.

यास्तव कुपात्र सोडुनि । श्रद्धादिगुणांहि युक्त होवोनी ॥
आहारदान द्यावें । सत्पात्रा भक्तिभाव तो धरुनी ॥६०॥

अर्थः— ह्मणून कुपात्र सोडून सुपात्रीं श्रद्धादि गुणांनीं युक्त होऊन भक्तिपूर्वक आहारदान द्यावें.

श्रद्धा शक्तिरलोभत्वं ।
दयाभक्तिक्षमान्विताः ॥
विज्ञानं चेति सप्तैते ।
गुणा दातुः प्रकीर्तिताः ॥ ६३ ॥

ओंवी.

श्रद्धा आणिक शक्ती । अलोभ दया भक्ती ॥
क्षमा विज्ञान हे असती । सात गुण दात्याचे ॥६१॥

अर्थः- श्रद्धा, शक्ति, अलोभ, दया, भक्ति, क्षमा आणि विज्ञान, हे सात गुण दात्याला सांगितले आहेत.

विधेयं सर्वदा दान-।
मभयं सर्वदेहिनाम् ॥
यतोऽन्यस्मिन्भवे जीवो।
निर्भयोऽभयदानतः ॥ ७४ ॥

आर्या.

जीवां सर्व सदोदित । मनुजानें अभयदान तें द्यावें ॥
तेणें तो जन्मांतरिं । निर्भयतेनेंच धन्यता पावे ॥ ६२ ॥

अर्थः— सर्व जीवांला नेहमीं अभयदान द्यावें, त्या योगानें हा जीव अन्यजन्मीं निर्भय होतो.

रोगिभ्यो भैषजं देयं।
रोगो देहविनाशकृत् ॥

देहनाशे कुतो ज्ञानं ।
ज्ञानाभावे न निर्वृतिः ॥ ६५ ॥
तस्मात् स्वशक्तितो दानं ।
भैषज्यं मोक्षहेतवे ॥
देहः स्वयं भवेऽन्यस्मि- ।
न्भवेद्व्याधिविवर्जितः ॥ ६६ ॥

शार्दूलवि०

रोगापासुनि देहनाश घडतो, त्या देहनाशामुळें ।
ज्ञानाभावचि होय, तें न असतां मुक्ती कुठोनी मिळे ॥
मुक्तीसाठिं स्वशक्तिनें मिळत ती रोग्यास द्या औषधी ।
तेणें अन्यभवांत सौख्य मिळतें, व्याधी न बाधे कधीं ॥

अर्थः- रोग्यांना औषध द्यावें. कारण रोग हा देहाचा नाश करणारा आहे. देहनाश झाल्यावर ज्ञान कोठून होणार? ज्ञान नसलें तर मुक्ति मिळत नाहीं. म्हणून आपल्या शक्तीप्रमाणें मुक्तीकरितां औषधदान द्यावें. तेणेंकरून अन्यजन्मीं

देह व्याधिरहित होतो.

लिखित्वा लेखयित्वा वा ।
साधुभ्यो दीयते श्रुतम् ॥
व्याख्यायतेऽथवा स्वेन ।
शास्त्रदानं तदुच्यते ॥ ६७ ॥

आर्या

लिहुनी अथवा लिहवुनि । साधूंना शास्त्रदान देतात ॥
कीं व्याख्यान तयाचें । देती त्या शास्त्रदान म्हणतात ६४

अर्थः— लिहून अथवा लिहवून साधूंना शास्त्रदान द्यावें अथवा स्वतः शास्त्राचें व्याख्यान करावें. याला शास्त्रदान म्हणतात.

अपरस्मिन्भवे जीवो ।
बिभर्ति सकलं श्रुतम् ॥
मोक्षसौख्यमवाप्नोति ।
शास्त्रदानफलान्नरः ॥ ६८ ॥

आर्या.

शास्त्राच्या दानानें ॥ जन्मांतरिं मनुज सर्वशास्त्रांत
निष्णात होउनीयां ॥ मोक्षसुखा करुनि घेतसे प्राप्त ॥६५॥

अर्थः— शास्त्रदानाच्या योगानें मनुष्य अन्यजन्मीं सर्वशास्त्रपारंगत होतो आणि मोक्षसौख्यहि प्राप्त करून घेतो.

ज्ञानवान् ज्ञानदानेन ।
निर्भयोऽभयदानः ॥
अन्नदानात्सुखी नित्यं ।
निर्व्याधिर्भेषजाद्भवेत् ॥ ६९ ॥

आर्या.

ज्ञानाच्या दानानें ॥ ज्ञानी, भयहीन अभय दानानें ॥
सुखि नित्य अन्नदानें ॥ होय निरोगीच औषधीदानें ॥६६॥

अर्थ— ज्ञानदानानें प्राणी अन्यजन्मीं ज्ञानी होतो. अभयदानानें निर्भय होतो, अन्नदानानें नित्यसुखी होतो आणि औषधदानानें नीरोगी होतो.

स्वर्णचन्दनपाषाणै- ।

श्चतुरंगुलमानकम् ॥
कारयित्वा जिनं भक्त्या ।
प्रत्यहं पूजयन्ति ये ॥ ७० ॥
परलोक सुखं भुक्त्वा ।
पश्चान्मन्दरपर्वते ॥
सुरपूजां ततो लब्ध्वा ।
निर्वृतिं यान्ति ते नराः ॥७१॥

आर्या.

चंदन हेम शिलादिक । यांचें चतुरंगुलप्रमाणाचें ॥
जिनबिंब करोनि सदां । पूजिति जे लोक भक्तिनें साचें ॥
ते परलोकिं सुखातें । भोगुनि मग मंदराद्रिवरि जाती ॥
अभिषेकं सुरांकडुनी । घेउनि जातात मुक्तिला अंतीं ॥

अर्थः— सुवर्ण, चंदन, पाषाण इत्यादिकांचें चार अंगुल प्रमाणाचें जिनबिंब करून प्रतिदिवशीं जे लोक भक्तीनें पूजितात ते परलोकीं सुख भोगून नंतर मंदरपर्वतावर देवांकडून अभिषेक करून

शेवटीं मुक्तीस जातात.

येनाकारेण मुक्तात्मा ।
शुक्लध्यानप्रभावतः ॥
तेनायं श्रीजिनो देवो ।
बिंबाकारेण पूज्यते ॥ ७२ ॥

आर्या.

ज्या आकारें झाला । शुक्लध्यानामुळेंच मुक्त जिन ॥
तैशी आकृति निर्मुनि । जिनबिंबा पूजितात भव्यजन १९

अर्थः– ज्या आकारानें शुक्लध्यानाच्या प्रभावामुळें श्रीजिनेंद्र मुक्तात्मा झाला त्या आकाराचें बिंब करून जिनेश्वर पूजिता जातो.

आप्तस्यासन्निधानेऽपि ।
पुण्यायाकृतिपूजनम् ॥
तार्क्ष्यमुद्रा न किं कुर्यु ।
र्विषसामर्थ्यसूदनम् ॥ ७३ ॥

आर्या.

नसला जिनेंद्र जवळीं । तरि आकृति पूजनांत पुण्य असे
दृष्टांत यास मुद्रा । गरुडाची विषबलास नाशितसे ७०

अर्थः- श्रीजिनेश्वर जवळ नसला तरी त्याच्या आकृती पूजा पुण्यकारक होते. त्याला उदाहरण गरुडमुद्रा विषसामर्थ्याचा नाश करित नाहीं काय?

जन्मजन्म यदभ्यस्तं ।
दानमध्ययनं तपः ॥
तेनैवाभ्यासयोगेन ।
तत्रैवाभ्यस्यते पुनः ॥ ७४ ॥

आर्या.

दानाध्ययनतपांचा । केला जो पूर्वजन्मि अभ्यास ।
तो पुढच्या जन्माला । सहजिच होतो पडे न सायास ७१

अर्थः- जन्मोजन्मीं ज्या दान, अध्ययन व तप यांचा जो अभ्यास केला त्याच अभ्यासाच्या योगानें त्याच दानपूजादिकांविषयीं पुनः अभ्यास होतो.

यद्गृहीतं व्रतं पूर्वं ।
साक्षीकृत्य जिनान्गुरून् ॥
तद्व्रताखण्डनं शील- ।
मिति प्राहुर्मुनीश्वराः ॥ ७५ ॥

उपजाति.

साक्षीस ठेवोनि गुरू जिनाला । घेतात जे पूर्विं जन व्रताला ॥
होऊं न देणें कधिं भंग त्याचा । तें शील बोले मुनिची सभाचा ॥

अर्थः— जिनाला व गुरूला साक्षी ठेवून जें व्रत पूर्वी घेतलें तें न मोडणें ह्याला मुनीश्वरांनीं शील असें ह्मटलें आहे.

यान्ति शीलवतां पुंसां ।
वश्यतां दुष्टमानवाः ॥
अत्युग्रा अपि तिर्यञ्चः ॥
क्षुद्रोपद्रवकारिणः ॥ ७६ ॥

आर्या.

दुष्ट मनुष्यें घातुक । पशु अथवा क्षुद्र जीव जे असती ॥

ते शीलयुक्त पुरुषा । वश होती नच उपद्रवा करिती ॥७३॥

अर्थः- दुष्ट मनुष्यें व भयंकर पशू आणि उपद्रव करणारे क्षुद्र जीवही शीलवान् पुरुषाला वश होतात.

उपवासो विधातव्यः ।
पञ्चम्यादिषु पर्वसु ॥
श्रेयोऽर्थं प्राणिभिर्भव्यै- ।
स्त्रिशुध्या निजशक्तितः ॥ ७७ ॥

आर्या.

करुनि त्रिकरण शुद्धी । साधाया स्वर्ग मोक्ष भव्यानें ॥
पंचम्यादिकपर्वीं । करणें उपवास शक्तिमानानें ॥ ७४ ॥

अर्थः— भव्य प्राण्यांनीं स्वर्ग मोक्ष साधण्याकरितां त्रिकरणशुद्धीनें; आपल्या शक्तीप्रमाणें पंचमी वगैरे पर्वकाळीं उपवास करावा.

तेन नश्यन्ति कर्माणि ।
सञ्चितानि पुराऽऽत्मना ॥

नष्टकर्मा ततः सिद्धिं ।
प्रयात्यत्र न संशयः ॥ ७८ ॥

शालिनी.

त्या योगानें पूर्वदुष्कर्मनाश ।
होतो नाहीं यांत संदेह खास ॥
ज्याचीं कर्में नष्टता पावलीं तो ।
आनंदानें मुक्तिला अंतिं जातो ॥ ७९ ॥

अर्थः- त्यायोगानें आपण पूर्वी केलेल्या दुष्कर्मांचा नाश होतो. ज्याचें कर्म नष्ट झालें तो शेवटीं मुक्तीस जातो यांत संशय नाहीं.

अष्टमी चाष्टकर्माणि ।
सिद्धिलाभा चतुर्दशी ॥
पंचमी केवलज्ञानं ।
तस्मात्तत्रयमाचरेत् ॥ ७९ ॥

आर्या.

उपवास अष्टमीचा । करित असे नाश अष्टकर्मांचा ॥

तद्वत चतुर्दशींचा । देतो उपवास लाभ सिद्धीचा ॥ ७६
तैसाच पंचमीचा । देतो उपवास केवलज्ञान ॥
यास्तव अवश्य करणें । पर्वांचीं हीं उपोषणें तीन ॥७७

अर्थः- अष्टमीचा उपवास अष्टकर्मांचा नाश करितो. चतुर्दशी सिद्धी देते आणि पंचमी केवलज्ञान देते. ह्मणून तीन पर्वांचे उपवास करावे.

पिपीलिकाद्यो जीवा ।
न लक्ष्यन्ते यतो निशि ॥
गिल्यन्ते भोक्तृभिर्जीवै- ।
स्ते पुनः कवलैः समम् ॥ ८० ॥

मुंगी आदिकरोनी । रात्रौ दिसती न जाति जीवांच्या ।
ग्रासासवें किती त्या । गिळिल्या जातात जेवणाराच्या॥

अर्थः— मुंगी वगैरे जीव रात्रीं दिसत नाहींत. त्यायोगानें जेवणाराच्या घांसाबरोबर ते जीव गिळिले जातात.

स्फुटितांघ्रिकरा दीना ।

ये काष्ठतृणवाहकाः ॥
कुचेला दुष्कुलाः सन्ति ।
ते रात्र्याहारसेवनात् ॥ ८१ ॥

शार्दूलवि०

ज्यांचे हस्तपदादि जाति फुटुनी जे दीन होवोनियां ॥
माथां वाहति लांकडें गवत यांचा भार बांधोनिया ॥
झाले नीचकुळांत वस्त्र न मिळे अंगावरी चांगलें ॥
रात्रीं भोजन सोडिलें न ह्मणुनी दुर्दैवि हे जाहले ॥८१॥

अर्थः– ज्यांचे हात पाय फुटले आहेत, जे दीन होऊन गवतालांकडांचे भारे वाहतात, आणि आंगावर चांगलें वस्त्रसुद्धां ज्यांना मिळत नाहीं, व नीच कुलांत उत्पन्न झालेले आहेत ते रात्रीं जेवूनच तसे झाले आहेत.

सुस्वरा निर्मलाङ्गाश्च ।
दिव्यवस्त्राविभूषणाः ॥
जायन्ते ये नराः पूर्वं ।

त्यक्तं तैर्निशि भोजनम् ॥ ८२ ॥

शार्दूलवि०

ज्यांचा सुस्वर मोद देत तनुही आहे बहू निर्मळ ॥
वस्त्रें आभरणें अमूल्य असतीं अंगावरी सोज्वळ ॥
ऐसे मानव जे जगांत दिसती पूर्वीं तयांनीं नसे ॥
रात्रीं भोजन सेविलें ह्मणुनियां ते भाग्यशाली असे ॥८०॥

अर्थः- ज्यांचा स्वर उत्तम आहे, ज्यांचा देह स्वच्छ आहे, ज्यांच्या अंगावर चांगलीं वस्त्रें आणि अलंकार असतात, अशीं जीं माणसें उत्पन्न होतात त्यांनीं पूर्वीं रात्रिभोजनाचा त्याग केला होता.

रात्रिभुक्तिफलान्मर्त्या ।
जायन्ते व्याधिपीडिताः ॥
दासा भृत्याः परेषां च ।
स्वबन्धुजनवर्जिताः ॥ ८३ ॥

आर्या.

रात्रीं भोजन केलें । ज्या मनुजें रोगयुक्त होउनि तो ॥
बांधव विरहित होउनि । परक्याचा दास जन्मवरि होतो ॥

अर्थः--- रात्रिभोजनाच्या योगानें माणसें व्याधिपीडित होतात; व दुसऱ्याचे दास, नोकर, व ज्यांना कोणी बंधू नाहीं असे होतात.

आरुह्य मत्तमातङ्गा- ।
न्वीज्यमानाः सुचामरैः ॥
ये यान्ति स्वजनैः सार्द्धं ।
ते निशाहारवर्जनात् ॥ ८४ ॥

इंद्रवज्रा.

हत्तीवरी जे नर बैसुनीयां । घेतात छत्रादिक ढाकुनीयां ।
लोकांसवें भूषविती धरित्री । ते त्यागिती भोजन पूर्वि रात्रीं

अर्थः-- जे उत्तम हत्तीवर बसून छत्रचामरादिक चिन्हांनीं युक्त होऊन आपल्या लोकांसह जातात ते रात्रिभोजनाच्या त्यागामुळेंच.

याः परेषां गृहे दास्यो ।
याः पुत्रपरिवर्जिताः ॥
या दौर्भाग्यग्रहग्रस्ता- ।

स्ता निशाहारभुक्तितः ॥ ८५ ॥

शार्दूलवि०

दासी होति परगृहीं रखडतीं ज्यां पुत्र नाहीं मुळीं ॥
ज्यांना थोर भयंकर ग्रहचि तो दुर्भाग्यरूपी गिळी ॥
ऐशा ज्या युवती जगांत दिसती त्या रात्रिंच्या भोजना ॥
सेवोनी बहुत प्रकार असल्या या भोगिती यातना ॥ ८५॥

अर्थः— ज्या दुसऱ्यांच्या घरीं दासी होतात, ज्यांना मुलगा नाहीं, आणि ज्यांना दुर्भाग्यरूपी ग्रहानें गिळिलें आहे, अशा स्त्रिया रात्रिभोजन करूनच तशा झाल्या असतात.

लीलया योषितो यान्ति ।
या यानगजवाजिषु ॥
वसन्ति दिव्यहर्म्येषु ।
ता रात्र्याहारवर्जनात् ॥ ८६ ॥

शार्दूल०

मेणा पालखि यांत बैसुनि गजाश्वारूढ होती सुखें ॥

लीलेनें रमती प्रफुल्ल दिसती मोदें जयांचीं मुखें ॥
राहायास जयांस दिव्य सदनें संपत्तिनें पूरित ॥
रात्रीं भोजन त्यागिलें म्हणुनि त्या रामा सुखा सेवित ८४

अर्थः--ज्या स्त्रिया मेणा पालखींतून अगर हत्ती घोड्यावरून लीलेनें बसून जातात, व दिव्य अशा मंदिरांत वास करितात त्या रात्रिभोजनाच्या त्यागामुळेंच.

दृश्यन्ते मर्त्यलोकेऽस्मि- ।
न्सुन्दरा ये नराधिपाः ॥
रात्र्यभुक्तिफलं सर्वं ।
तदेव हि न संशयः ॥ ८७ ॥

आर्या.

जे या मानवलोकीं । सुंदरसे भूप दृष्टिला दिसती ॥
फल तें रात्रीं भोजन । त्यागाचें होय आण हें चित्तीं ८५

अर्थः या— मनुष्यलोकीं जे सुंदर राजे दृष्टीस पडतात तें सर्व रात्रिभोजनत्यागाचेंच फळ होय.

यथा चन्द्रं विना रात्रिः ।
कमलेन विना सरः ॥
तथा न शोभते जीवो ।
विना धर्मेण सर्वदा ॥ ८८ ॥

भुजंगप्र.

जशी रात्र चंद्राविणें शोभते न ॥
तडागा न शोभा तशी पद्महीन ॥
तसा जीव धर्माविणें केधवांही ॥
न शोभेच सिद्धांत हा थोर पाहीं ॥ ८८

अर्थ—जशी चंद्राशिवाय रात्र शोभत नाहीं, अथवा कमळावांचून सरोवर शोभत नाहीं, तसा जीव धर्मावांचून केव्हांही शोभत नाहीं.

अद्य श्वो वा परस्मिन्वा ।
दिने धर्मं करोम्यहम् ॥
चिन्तयन्ति जना एवं ।
क्षणं न सहते यमः ॥ ८९ ॥

आर्या.

मी आज उद्यां परवां । वाटे मनुजास धर्म तो करिन ॥
परि एक क्षण देखिल । यमराजातें विलंब सोसे न ॥८७॥

अर्थः—मी आज धर्म करीन अथवा उद्यां करीन किंवा परवा दिवशीं करीन असें लोक मनांत चिंतित असतात, पण, यमाला एक क्षण देखील विलंब सोसत नाहीं.

दावाग्निः शुष्कमार्द्रं वा ।
काष्ठं न त्यजति ध्रुवम् ॥
यथा तथा यमो लोके ।
बालं वृद्धं च यौवनम् ॥ ९० ॥

भुजंगप्र०

जसें कोरडें वाळलें अग्नि काष्ठ ॥
न पाहे तसें क्षुद्र किंवा वरिष्ठ ॥
असो सान वा थोर की वृद्ध मारी ॥
तया काल तो होतसे नाशकारी ॥ ८८ ॥

अर्थ- दावाग्नि जसा अंकूड ओलें असो किंवा वाळलेलें असो त्याला जाळून टाकितो, त्याप्रमाणें मनुष्य लहान असो, तरुण असो, किंवा म्हातारा असो तरी यम त्याचा नाश करितोच.

वृक्षा दावाग्निना लग्नास्तत्सख्यं कुर्वते वने आत्मारूढतरोरग्निमागच्छन्तं न वेत्त्यसौ

आर्या.

दावाग्निग्रासिततरु । अग्नीशीं करित सख्यभावास ॥
परि देहरूपतरुवरी । चढलेल्या जीव जाणिना त्यास ८९

अर्थः- वनांत दावाग्नीनें ग्रासलेले वृक्ष त्या दावाग्नीशीं मैत्री करतात, परंतु, जीव आपण ज्यावर चढलेले आहोंत अशा देहरूपी वृक्षाजवळ येत असलेल्या अग्नीस जाणत नाहीं.

**अन्यस्यान्यः समाख्याति ।
मृतोऽद्य दिवसेऽमुकः ॥
एवं स किं न जानाति ।**

ममाप्येति यमः कश्चित् ॥ ९८ ॥

सांगे दुसरा तिसऱ्या । मेला तो अमुक एक मानव हो ॥
परि गांठिल स्वतांला । केव्हांतरि हें न जाणतो कां हो ॥

अर्थः- दुसरा मनुष्य तिसऱ्यास सांगतो कीं, अमुक मनुष्य आज मेला; पण तो असें कां जाणत नांहीं कीं, मलाहि यम केव्हांहि गांठणारच.

शरीरमंडनं शीलं स्वर्णं खेदावहं तनोः ॥
रोगो वक्रस्य तांबूलं सत्येनैवोज्ज्वलं मुखम्

देहास या शीलच भूषवीते । सोनें रुपें हें बहु खेद देतें ॥
तांबूल हें तो मुखरोग आहे । सत्येंचि तें उज्वल जाण तूं हे ॥

अर्थः— देहाला शीलच अलंकार आहे. सोनें खेदकारक आहे. तांबूल हें मुखाला रोग आहे आणि सत्यवचनानेंच मुख सुशोभित दिसतें.

कालक्षेपो न कर्तव्य आयुः क्षीणं दिनेदिने
यमस्य करुणा नास्ति धर्मस्य त्वरिता गतिः

कालक्षेप न करणें । व्यर्थचि, आयुष्य प्रत्यहीं जातें ॥
करुणा न यमा म्हणुनी । सत्वर धरणेंचि धर्ममार्गातें ॥ ९९ ॥

अर्थः- व्यर्थ कालक्षेप करूं नये. प्रतिदिवशीं आयुष्य कमी होत जातें. यमाला करुणा नाहीं ह्मणून त्वरित धर्ममार्ग धरावा.

अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः
नित्यं सन्निहितो मृत्यु' कर्तव्यो धर्मसंग्रहः


आहे देह अनित्यचि । वाढे वैभव सर्वेचि होय उणें ॥
मृत्यू मात्र जवळ तो । ह्मणुनि सतत धर्मसंग्रहा करणें१३

अर्थः— शरीर अनित्य आहे. ऐश्वर्य अशाश्वत आहे. मृत्यू मात्र नित्य जवळ आहे; ह्मणून सतत धर्मसंग्रह करावा.

जीवंतं मृतकं मन्ये देहिनं धर्मवर्जितम् ॥
मृतो धर्मेण संयुक्तो दीर्घजीवी भविष्यति

धर्मरहित जीवाला । समजे मी मृत जिवंत जरि असला ॥
चिरकाल वांचणारा । होइल तो धर्मयुक्त जरि मेला ॥१४॥

अर्थः— धर्मवर्जित जीवाला जीवंत असूनहि मेला असें मी समजतों. धर्मयुक्त जीव मेला तरी तो चिरकाल जगणारा होईल.



प्रश्नोत्तर

माणिक्यमाला

B. B.

किंमत ८ आणे

महावीरशक २४३५

श्री.

प्रश्नोत्तरमाणिक्यमाला.

नमः श्रीवीतरागाय ।
सर्वदोषातिगाय वै ॥
पंचकल्याणयुक्ताय ।
कर्माष्टकहुताय च ॥ १ ॥

अर्थः-- ज्यानें सर्व कर्मे जाळून टाकिली आहेत, जो गर्भावतरणादि पंचकल्याणयुक्त आणि सर्वदोषरहित असा वीतराग त्यास नमस्कार असो.

अर्हन्तं परमं सिद्ध- ।
आचार्यं पाठकं तथा ॥
वन्देऽहं सर्वसाधूंश्च ।
कर्मघ्नं च गुणाकरम् ॥ २ ॥

अर्थः— सद्‌गुणांची केवळ खाण आणि कर्माचा नाश करणारे असे अर्हत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि सर्वसाधू त्यांस मी वंदन करितों.

श्रीशारदां सदा नौमि ।
भूतमात्राभयप्रदाम् ॥
षट्‌तर्कजलधौ नौकां ।
नरामरनतक्रमाम् ॥ ३ ॥

अर्थः— सर्व जीवांस अभय देणारी, षट्‌तर्करूपी समुद्रांतून तरून जाण्यास नौकेसारखी आणि देव व मनुष्यादिकांस पूज्य आहेत पाय जिचे अशा त्या सरस्वतीस निरंतर स्तवितों.

गुणोपेतं गणाधीशं ।
ऋषितत्वप्रदीपकम् ॥
वंशेजातं नृपेशस्य ।
देवेंद्रनुतं स्तुवे ॥ ४ ॥

अर्थः— चौऱ्याशीलक्ष गुणांनीं शोभणारा, मुनीचें

तत्त्व प्रकाशित करणारा, देवेंद्रांकडून पूजिला जाणारा, आदितीर्थंकराच्या वंशांत उत्पन्न झालेला जो वृषभसेन गणधर त्यास मी स्तवितों.

गौतमाद्या मुनीन्द्रा ये ।
धर्मदेशनतत्पराः ॥
ते सर्वे मे शुभं दद्युः ।
सततं ज्ञानसागराः ॥ ५ ॥

अर्थः— ज्ञानाचे केवळ समुद्रच आणि धर्मोपदेश करण्याविषयीं तत्पर असे जे गौतमादि मुनीश्वर ते सगळे मला सुख देवोत.

सुधर्मं जिनसेनं च ।
गुणभद्रं गुणान्वितम् ॥
अकलंकं सदा वन्दे ।
पूज्यपादं मुनीश्वरम् ॥ ६ ॥

अर्थः— सुधर्मस्वामी, जिनसेन, गुणभद्र, अकलंक आणि पूज्यपाद या सर्व मुनीश्वरांस मी वंदन करितों.

रविषेणं प्रभाचन्द्रं ।
रामसेनं जितेन्द्रियम् ॥
नमामि सततं भक्त्या ।
श्रीभूषणदिगंबरम् ॥ ७ ॥

अर्थः– रविषेण, प्रभाचन्द्र, रामसेन श्रीभूषण या सर्व दिगंबर मुनींस मी निरंतर भक्तिपूर्वक नमस्कार करितों.

श्रीगुरोः पत्कजं नत्वा ।
कृत्वा शुद्धं मनो निजम् ॥
करकुड्मलमायोज्य ।
शिष्यः पृच्छति सद्गुरुम् ॥ ८ ॥

अर्थः— कोणी एक शिष्य मन शुद्ध करून, श्रीगुरूच्या पदकमलास नमस्कार करून: हात जोडून विनयपूर्वक सद्गुरूस प्रश्न करितो.

हे स्वामिन् संसारे सारं किम्?

अर्थः– हे स्वामी संसारांत सार काय?

सेविज्जे अरिहंतो ।

पालिज्जो हिंसाइवज्जियो धम्मो ॥
वन्दिज्जो णिग्गंथो ।
संसारे इत्थयं सारम् ॥ ९ ॥

अर्थः— अर्हत्परमेश्वराची सेवा करावी, अहिंसा धर्माचें पालन करावें आणि निर्ग्रंथ मुनीस नमस्कार करावा, हेंच संसारांत सुख देणारें आहे.

भो स्वामिन् को देवो मान्यः?

अर्थः— हे स्वामी कोणता देव मानण्यास योग्य होय?

जिनराजो गुणाम्भोधि- ।
र्भवसागरतारकः ॥
दोषातिगो महाज्ञानी ।
देवो मान्यो हितंकरः ॥ १० ॥

अर्थः— जिनेश्वर हा सद्गुणांचा समुद्र, संसारसमुद्रांतून तारणारा, सर्व दोषांपासून दूर, मोठा ज्ञानी आणि हित करणारा आहे. म्हणून तो सर्वांस मान्य असा देव होय.

भो यतीन्द्र जिनस्य कति भेदाः?

अर्थः— हे यतिश्रेष्ठा, जिनांचे भेद किती?

णामजिणा जिणणामा ।
ठवणजिणा तहमु तास पडिमाओ ॥
दव्वजिणा जिणजीवा ।
भावजिणा समवसरणत्था ॥ ११ ॥

अर्थः— जिनेश्वरांचीं जीं नांवें तें नाम जिनेश्वर होत. उदाहरणः— वृषभ, अजित वगैरे. रत्नपाषाणादिनिर्मित ज्या जिनाच्या प्रतिमा ते स्थापना जिनेश्वर होत. जिनेश्वरांचे जे जीव ते द्रव्य जिनेश्वर आणि समवसरण विराजमान जो जिनेश्वर तो भाव जिनेश्वर होय. याप्रमाणें नाम, स्थापना, द्रव्य आणि भाव असे जिनांचे चार भेद आहेत.

भो मुनीन्द्र जिनस्य गुणाः के?

अर्थ— हे मुनिश्रेष्ठ, जिनाचे गुण कोणते?

वर अइसय चउतीसा ।

अट्ठमहापाडिहारसंजुत्ता ॥
अणंतचतुट्ठगसहिया ।
छयाला अरुहगाहस्स ॥ १२ ॥

अर्थः— चौतीस अतिशय, आठ प्रातिहार्य आणि अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य अनंतसुख हे चार मिळून जिनाचे मुख्य गुण शेचाळीस. आणखी गुण अनंत आहेत, त्यांची मोजणी करण्यास कोणी समर्थ नाहीं.

भो मुनिपुंगव, जिनेन्द्रेण दोषा विध्वस्तास्ते के?

अर्थः— हे मुनिश्रेष्ठ, जिनानें ज्या दोषाचा ध्वंस केला ते कोणते?

क्षुधा तृषा भयं द्वेषो ।
रागो मोहश्च चिन्तनम् ॥
जरा रुजश्च मृत्युश्च ।
स्वेदः खेदो मदो रतिः ॥ १३ ॥
विस्मयो जननं निद्रा ।
विषादोऽष्टादश ध्रुवम् ॥

एतैर्दोषैर्विनिर्मुक्तः ।
सोऽयमाप्तो जिनोत्तमः ॥ १४ ॥

अर्थः— भूक, तहान, भय, द्वेष, राग (विषयप्रीति,) मोह, चिंता, आतारपण, रोग, मरण, घाम, दुःख, गर्व रति (विषयासक्ति) आश्चर्य, जन्म, झोंप, आणि विषाद हे अठरा दोष ज्यास नाहीत तो जिनश्रेष्ठ किंवा आप्त होय.

अहो गुरुदेव, अर्हत्प्रभुर्जनान् स्वयं हस्तावलंबनेन मोक्षं नयति अथवा उपचारेण?

अर्थः— हे गुरो, अरहंतदेव आपल्या भक्तजनांस उपचारानें कीं स्वतः हस्तानें मोक्षास नेतो?

अरिहंता असमत्था ।
तारणलोयाइदिग्घसंसारे ॥
मग्गणदेसणकुसला
तरंति ते मग्ग लग्गन्ति ॥ १५ ॥

अर्थः— या दीर्घ संसारांत लोकांचें तारण करण्यास

अर्हत्प्रभु असमर्थ आहे खरा, तथापि तो मोक्षाच्या प्राप्तीचा उपाय दाखविण्यास कुशल आहे. त्यानें दाखविलेल्या मार्गानें जे जातात ते मोक्षास पावतात. तेव्हां उपचारानें अर्हत्परमेश्वर मोक्षदाता होय.

भो स्वामिन् कीदृशो धर्मः ?

अर्थः— हे स्वामी, धर्म कसा आहे ?

अहिंसा परमो धर्मो ।
दशलक्षणसंयुतः ॥
द्विविधो जिनवक्त्राब्जा ।
त्संजातो मोक्षदायकः ॥ १६ ॥

अर्थः— अहिंसा म्हणजे जीववध न करणें हा उत्कृष्ट धर्म होय. क्षमा, मार्दव वगैरे दहा लक्षणें या धर्मास आहेत. हा अहिंसा धर्म मोक्षाची प्राप्ती करून देणारा आहे. हा जिनमुखापासून जगांत प्रसिद्ध झाला आहे. व्यवहार आणि निश्चय किंवा सागार आणि अनगार असे याचे दोन भेद आहेत.

भो मुनींद्र निर्ग्रन्थाचार्याः के ?

अर्थः— हे मुनीन्द्रा, निर्ग्रन्थाचार्य कोण ?

ये रत्नत्रयधारिणो दशविधे
धर्मे प्रिये संस्थिताः । लाभा
लाभसमा जितेन्द्रियपरा ध्या-
यन्ति कर्मक्षयम् ॥ ये षट्जी-
वविराधनैकविरता मानापमा-
ने समा । ये कुर्वन्त्यपि निःस्पृहं
वरतपो वन्दाम्यहं तान्गुरून ॥ १७ ॥

अर्थः— सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र रूपी तीन रत्नांचे धारक, क्षमादि दहाप्रकारचा धर्म पाळणारे, लाभालाभाविषयीं आनंद आणि दुःख न मानणारे, पंचेंद्रियांस जिंकणारे, कर्मक्षय कसा करावा याचा विचार करणारे, षट्काय जीवांचा वध न होईल अशाविषयीं निरंतर सावध राहणारे, मान आणि अपमान या दोहोंविषयीं समवृत्तीनें असणारे आणि कोणत्याही

लाभाची इच्छा नसूनही तीव्र तपश्चर्या करणारे असे जे मुनि ते वन्द्य होत म्हणून मी त्यांस नमस्कार करितों.

भो मुनीन्द्र आचार्यस्य के गुणाः ?

अर्थः— हे मुनीश्वरा, आचार्यांचे गुण कोणते ?

बारह तप छावस्सय ।
पंचाचारा तहेव दहधम्मा ॥
गुत्तित्तयसंजुत्ता ।
छत्तीसगुणा मुणेयव्वा ॥ १८ ॥

अर्थः— बारा प्रकारचें तप, सहा आवश्यक क्रिया ज्ञानाचार, दर्शनाचार, वीर्याचार, चारित्राचार आणि तप आचार असे पाच आचार, क्षमादि दहा धर्म, मनोगुप्ति वचनगुप्ति व कायगुप्ति मिळून छत्तीस गुण ज्यास आहेत तो आचार्य परमेष्ठी होय.

भो स्वामिन् पाठकस्य के गुणाः ?

अर्थः— हे स्वामी उपाध्यायाचे गुण कोणते ?

एयारसंगसहिया ।

चोद्दसपुव्वाइ णिरवसेसाइ ॥
पणवीसगुणसंजुत्ता ।
णाणयस्स तस्स उवझाइ ॥ १९ ॥

अर्थः— आकरा अंग आणि चौदा पूर्वे मिळून २५ पंचवीस गुण उपाध्याय परमेष्ठीस असतात. अर्थात् ११ अंग व १४ पूर्वे शास्त्र जो जाणतो तो उपाध्याय होय.

भो गुरो साधोर्गुणाः कियन्तः ?

अर्थः— हे गुरो साधूचे गुण किती ?

वदसमइंदियरोधो ।
लोचो अवास अचेलमस्नानं ।
खिदिसयमदन्तधावण ।
ठिदिभोयणमेयभत्तं च ॥ २० ॥

अर्थः— पांच महाव्रतें, पांच समिति, पांच इंद्रियांचा रोध, सहा आवश्यक क्रिया, लोंच (केश उपटणें) अंगावर वस्त्र न घेणें, स्नान न करणें, जमिनीवर निजणें, दांत न घांसणें, उभें राहूनच जेवणें आणि २४ तासांतून

एकवेळ निर्दोष आहार घेणें मिळून २८ गुण साधु परमेष्ठीस असतात.

भो गुरुदेव सिद्धपरमात्मनः के गुणाः ?

अर्थः— हे गुरो, सिद्धाचे गुण कोणते ?

सम्मत्तणाणदंसण- ।
वीरियसुहमं तहेव अवगहणं ॥
अगुरूलघुमव्वाहं ।
अट्ठगुणा होंति सिद्धाणं ॥ २१ ॥

अर्थः— सम्यग्ज्ञान, सम्यग्दर्शन, अनंतवीर्य, अनंतसुख, अवगहन, अगुरुत्व, अलघुत्व, अव्याबाधता हे आठ गुण सिद्धांस असतात.

भो देव सिद्धपरमात्मनः सिद्धालये कियत्सौख्यमस्ति ?

अर्थः— हे देवा सिद्धालयांत सिद्धपरमात्म्यास किती सुख असतें ?

चक्की फणी सुरिंदे ।

अहमिंदे जं सुहं तियाळेयं ॥
तत्तो अणंत गुणिदं ।
सिद्धाणं खणं सुहं होदी ॥ २२ ॥

अर्थः— चक्रवर्ती, नागेंद्र, देवेंद्र, अहमिंद्र, या सर्वांस तीनही कालांत जितकें सुख असतें, त्याच्या अनंतपट सुख सिद्धांस प्रत्येक क्षणीं होत असतें.

भो स्वामिन् के गुरवो नमस्याः ?

अर्थः— नमस्कारास योग्य असे गुरु कोणते ?

अनर्घ्यरत्नत्रयसंपदोऽपि ।
निर्ग्रंथतायाः पदमद्वितीयं ॥
अपि प्रशांताः स्मरवैरिवध्वा ।
वैधव्यदास्ते गुरवो नमस्याः ॥ २४ ॥

अर्थः— सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, आणि सम्यक्चारित्र या तीन अमूल्य रत्नांनी संपन्न असूनही, अत्यंत परिग्रह रहित असे, आणि शांत स्वभावाचे असूनही मन्मथास ज्यांनी जिंकिलें आहे असे जे गुरु, ते नमस्कारास योग्य होत.

भो गुरुदेव धर्मस्य किं लक्षणम् ?

अर्थः— हे गुरो धर्माचें लक्षण काय ?

धम्मो वत्थुसहावो ।

जीवंगाणं च रक्खणं धम्मो ॥

रयणत्तयं च धम्मो ।

उत्तमक्षमादिदसविहो धम्मो ॥ २४ ॥

अर्थः— वस्तूचा जो स्वभाव तो धर्म होय. जीवांचें रक्षण करणें, रत्नत्रय (सम्यग्दर्शन सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र) आणि उत्तमक्षमा, मार्दव, आर्जव, सत्य, शौच, संयम, तप, त्याग, आकिंचन्य (किंचित्‌ही परिग्रह न ठेवणें) आणि ब्रह्मचर्य हे सगळे आत्म्याचे स्वभाव होत. या स्वभावांस धर्म अशी संज्ञा आहे.

सम्यग्दर्शनवर्णनम्.

भो ज्ञानसागर, सम्यग्दर्शनस्य किं लक्षणम्?

अर्थः— हे ज्ञानसागरा, सम्यग्दर्शन ह्मणजे काय ?

नास्ति चार्हत्परो देवो ।

धर्मो नास्ति दयां विना ॥
तपो नास्ति च नैर्ग्रन्थ्यात् ।
देतत्सम्यक्त्वलक्षणम् ॥ २५ ॥

अर्थः– अरहंता शिवाय दुसरा देव नाही. दयेशिवाय दुसरा धर्म नाहीं आणि निर्ग्रंथपणा शिवाय दुसरें तप नाहीं असा जो निश्चय करणें त्याचें नांव सम्यग्दर्शन

भो यतिनाथ सम्यग्दर्शन युक्तस्य गुणाः के?

अर्थः– हे यतिश्रेष्ठा, सम्यग्दृष्टि श्रावकाचे गुण कोणते?

संवेगो निर्वेगोऽनिंदा ।
गर्हा तथोपशमभक्तिः ॥
अनुकंपा वात्सल्यं ।
गुणास्तु सम्यक्त्वयुक्तस्य ॥ २६ ॥

अर्थः –संवेग (धर्म आणि धर्माच्या फलाविषयीं प्रेम बाळगणें) निर्वेग (संसारांत असूनही 'त्याचा अनित्यपणाचा स्वभाव ओळखून , विरक्त असणें)' अनिंदा (दुसऱ्याची निंदा न करणें) 'गर्हा (आपल्या)

अंगीं किती सद्गुण असले तरी त्या विषयीं थोरवी न मानून उलट आपल्या ठिकाणीं उत्तम गुण कांहींच नाहीं इत्यादि अनेक प्रकारें आपली आपणच निंदा करून घेणें), उपशमभक्ति (क्रोध, मान, माया, आणि लोभ वगैरे कषाय शांत ठेवणें किंवा शांत ठेऊन जिनाची भक्ती करणें), अनुकंपा [सर्व जीवांवर दया करणें] आणि वात्सल्य [गाय जशी आपल्या वासरावर प्रेम करिते त्याप्रमाणें आपल्या धर्मातील लोकांवर प्रेम करणें किंवा ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें आदर, मान करणें] हे सात गुण ज्यास असतात तो सम्यग्दृष्टि होय.

भो ब्रह्मरूप सम्यग्दर्शनस्य किं फलम्?

अर्थः— हे ब्रह्मस्वरूपा, सम्यग्दर्शनाचें फळ काय?

सम्माइट्ठी जीवो ।
दुग्गइहेदू ण बंधए कम्मं ॥
जं बहुभवे सुबद्धं ।

दुक्कम्मं तं पि णासयदि ॥ २७ ॥

अर्थः— सम्यग्दृष्टि जीवांस सम्यग्दर्शनानें नरक, तिर्यंच वगैरे वाईट गतीचा बंध घडत नाहीं आणि पूर्वी अनेक जन्मांत घडलेलें जें दुष्कर्म त्याचाही नाश होतो.

भो गुरुदेव सम्यक्त्वस्यातिचाराः के?

अर्थः— हे गुरो सम्यक्त्वाचे अतिचार कोणते?

दह कंदा पंच फला
(पंचवीसगाइ?) पंच
कुसुमाइ ॥ महुमज्जमं-
सवीरइ अतिचारा
होंति संमत्ते ॥ २८ ॥

अर्थः— लसून, कांदा, रताळ वगैरे दहा प्रकारचे कंद, पंचऔदुंबर (वड, हुंबर, पिंपळ वगैरे वृक्षांचीं फळें) पांच तऱ्हेचीं फुलें ['पंचवीसगाइ' या पदाचा अर्थ कळत नाहीं.] मध, मांस आणि मद्य [दारु] इत्यादि पदार्थ सम्यग्दृष्टि श्रावकानें खाऊं नयेत.

भो यतींद्र सम्यक्त्वयोग्यः पुरुषः कः ?

अर्थ— हे यतिश्रेष्ठा, सम्यक्त्वास योग्य असा पुरुष कोण?

भाषाबुद्धिविवेकवाक्यकुशलः
शंकादिदोषातिगो । गंभीरः
प्रशमास्त्रिया परिगतो वश्येंद्रियो
धैर्यवान ॥ प्रावीण्यं यदि नि-
श्चये व्यवहृतौ भक्तिश्च देव गुरा- ।
वौचित्यादिगुणैरलंकृतवपुः स-
म्यक्त्वयोग्यो भवेत् ॥ २९ ॥

अर्थः— ज्याची भाषा उत्तम [सत्य], जो बुद्धिवान, विवेकी, बोलण्यांत पठाईत, शंकादि दोष ज्याला नाहीत, जो दिसण्यांत गंभीर, शांतस्वभावी, संसारांत कितीहि अडचणी आल्या तरी प्राणांतसमयींहि न डगमगणारा, जिनाशिवाय इतरांस शरण न जाणारा, व्यवहार निश्चय धर्म आणि देवगुरुविषयीं भक्ति इत्यादि

योग्य गुण ज्यास आहेत तो पुरुष श्रेष्ठ सम्यक्त्व पाळण्यास समर्थ होय.

भो गुरुदेव सम्यक्त्वस्य किं महात्म्यम् ?

अर्थः– हे गुरो सम्यग्दर्शनाचें काय माहात्म्य?

तावद्भीमो भवांभोधि- ।
स्तावज्जन्मपरंपरा ॥
तावत् दुःखानि यावन्न ।
सता सम्यक्त्वसंभवः ॥ ३० ॥

अर्थ– जों पर्यंत सम्यक्त्व नाहीं तों पर्यंतच हा संसारसमुद्र भयंकर वाटतो, तों पर्यंतच जन्ममरण आणि दुःखेंही तों पर्यंतच.

सम्यक्त्वरत्नान्न परं हि रत्नं ।
सम्यक्त्वमित्रान्न परं हि मित्रम् ॥
सम्यक्त्वबन्धोर्न परोऽस्ति बन्धुः ।
सम्यक्त्वलाभान्न परो हि लाभः ॥ ३१ ॥

अर्थः– सम्यक्त्वाशिवाय दुसरें रत्न नाहीं, सम्य-

क्त्वाशिवाय दुसरा मित्र नाहीं, सम्यक्त्वाशिवाय दुसरा बंधु नाहीं आणि सम्यक्त्वाशिवाय दुसरा लाभही नाहीं. जगांत चांगलें ह्मणून जें काय आहे तें सम्यक्त्वच, त्याच्या बरोबरीचें दुसरें कोणतेंच नाहीं.

भो गुरुदेव दर्शनभ्रष्टो जीवः सिध्यति वा न?

अर्थः— हे गुरो, दर्शनभ्रष्ट. जीव मुक्त होतो कीं नाहीं?

दंसणभट्टा भट्टा दंसणभट्टस्स
णत्थि णिव्वाणम् ॥ सिज्झदि
चरियभट्टा दंसणभट्टा
ण सिज्झंति ॥ ३२ ॥

अर्थः— जो सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट झाला (मिथ्यात्वी झाला) तो भ्रष्टच झाला. त्यास निर्वाणसुख होणार नाहीं. सम्यग्दर्शनी असून चारित्रभ्रष्ट झाला तर तो जीव कालांतरानें तरी ‘ ज्ञानपूर्वक ’ चारित्र पाळून सिद्धीस पावेल; पण, मिथ्यात्वी जीव कधींही निर्वाणपद पावणार नाहीं.

भो गुरो संसारे पेयं किम् ?

अर्थः- हे गुरो, संसारांत पान करण्यास योग्य असें काय आहे ?

अतुलसुखनिधानं सर्वकल्याणबीजं ।
जननजलधिपोतं भव्यसत्वैकपात्रम् ॥
दुरिततरुकुठारं पुण्यतीर्थप्रधानं ।
पिबतु जितविपक्षं दर्शनाख्यं सुधाम्बु ॥ ३३

अर्थः— ज्याची तुलना करण्यास जगांत दुसरा पदार्थच नाहीं अशा सुखाचें केवळ निधान (सांठा) सगळ्या सुखाचें बीज, जन्मरूपी समुद्रांतून तरून जाण्यास नौकासमान. भव्य जीवाशिवाय इतर ठिकाणीं न असणारें. पापरूपी वृक्ष तोडण्यास जशीकाय कुऱ्हाडच, सगळ्या पुण्यतीर्थांत श्रेष्ठ, आपल्या गुणानें मिथ्यामतास ज्यानें जिंकिलें आहे असें हें सम्यग्दर्शन नांवाचें अमृत सेवन करा.

सम्यक्त्वभूषणास्ति ।

भूषणं भुवनत्रये ॥
धनं सर्वधनेभ्यो हि ।
सम्यक्त्वधनमुत्तमम् ॥ २४ ॥

अर्थः— सगळ्या जगांत सम्यग्दर्शनासारखें दुसरें भूषण नाहीं, आणि सर्वप्रकारच्या धनांत सम्यग्दर्शन नांवाचें धन श्रेष्ठ आहे.

ज्ञानवर्णनम्.

ज्ञानं स्यात्कुमतान्धकार-
तरणिर्ज्ञानं जगल्लोचनं ।
ज्ञानं नीतितरङ्गिणीजल-
निधिर्ज्ञानं कषायापहम् ॥
ज्ञानं निर्वृतिवश्यमन्त्र-
ममलं ज्ञानं मनःपावनं ।
ज्ञानं स्वर्गगतिप्रयाण-
पटहं ज्ञानं निदानं श्रियः ॥ १ ॥

अर्थः– ज्ञान हें मिथ्यामतरूपी अन्धकाराचा नाश

करण्यास सूर्याप्रमाणें आहे, सगळ्या जगाचे नेत्र आहे, नीतिरूपी नद्यांचें उत्पत्तिस्थान आहे, क्रोध वगैरे कषायांचा नाश करणारें आहे, मुक्तिरूपी स्त्रीस वश करण्याचा मंत्र आहे, मनास पवित्र करणारें आहे, स्वर्गास प्रयाण करावयाच्या वेळेचा नगारा आहे आणि सगळ्या संपत्तीचें माहेरघर आहे.

अहो श्रीपूज्यपाद, ज्ञानहीना नराः कीदृशाः?

अर्थः— हे श्रीपूज्यपादा, ज्ञानहीन मनुष्य कसे होत?

आहारनिद्राभयमैथुनानि ।
चत्वारि संज्ञानि वसन्ति देहे ॥
ज्ञानं नराणामधिको विशेषो ।
ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥

अर्थः— खाणें, झोंप घेणें, भय आणि मैथुन या चार संज्ञा मनुष्याच्या आणि पशूंच्याही देहामध्यें असतात. त्यांत मनुष्य आणि पशु या उभयतांत विशेष (फरक) हाच कीं, ज्याला ज्ञान आहे तो मनुष्य आणि

ज्याला ज्ञान नाहीं तो पशु होय.

भो गुरो, ज्ञानहीनपुरुषस्य शास्त्रं कीदृशम् ?

अर्थः– हे गुरो, ज्ञानाशिवाय मनुष्यास शास्त्र कसें होय?

यथा खरश्चन्दनभारवाही ।
भारस्य वाही न तु चन्दनस्य ॥
एवं मनुष्याः श्रुतिशास्त्रपूर्णा ।
ज्ञानेन हीनाः खरवद्वहन्ति ॥ ३ ॥

अर्थ— गाढवाच्या पाठीवर चंदनाच्या लांकडाचें ओझें असलें तरी, तो ओझें वाहणाराच होय. त्याला चंदनाचा गंध काय कळणार? कळणार नाहींच. त्याप्रमाणें पुष्कळ शास्त्र पाठ करूनही ज्यास त्यांतील रहस्य कळलें नाहीं. तो मनुष्य ओझें वाहणारा गाढवच होय.

सज्ञानी अज्ञानिनोः किमन्तरम् ॥

अर्थः– सज्ञानी आणि अज्ञानी या दोघांत अंतर काय?

जं अण्णाणी कम्मं ।
खवदीओ भवसहस्स कोडीणं ॥
तं णाणी तिहिजुत्तो ।
खवेइ उस्सासमत्तेण ॥ ४ ॥

अर्थः— अज्ञानी मनुष्य कोट्यावधि जन्मांत 'काय-क्लेश भोगून' जितक्या कर्माचा नाश करितो, तितकें कर्म ज्ञानी मनुष्य उच्छ्वासमात्र कालांत नाश करून टाकितो.

ज्ञाने किं किं कथितम् ?

अर्थः— ज्ञानांत काय काय सांगितलें आहे ?

भूमिर्भूधरसागरा जिनवराः स्वर्गाश्च
सिद्धालयाः । पातालस्य ततिस्तथा-
ऽमरफणीमर्त्येन्द्रभाग्यं खलु ॥ देवी-
देवगणास्तथा वननदीक्षेत्राणि बी-
जाङ्कुरा । वर्णावर्णविचारकर्मनिचयं
सर्वं प्रविष्टं चिदि ॥ ५ ॥

अर्थः— पृथ्वी, पर्वत, समुद्र, जिनेश्वर, स्वर्ग, मोक्ष, पाताळ, देवेंद्र, नागेंद्र, चक्रवर्ती आणि त्यांचें भाग्य, देवी, देव, वन, नदी, क्षेत्र, बीज, अंकुर, वर्णावर्णाविषयीं विचार, कर्म इत्यादि सर्व कांहीं ज्ञानांत भरलें आहे. ह्मणजे ज्ञानाशिवाय कोणतेंही समजत नाहीं.

संसारे किमाराधनीयम्?

अर्थः— संसारांत काय मिळवावें?

दुरिततिमिरहंसं मोक्षलक्ष्मीसरोजं ।
मदनभुजगमन्त्रं चित्तमातङ्गसिंहम् ॥
व्यसनघनसमीरं विश्वतत्त्वप्रदीपं ।
विषयसफरिजालं ज्ञानमाराधय त्वम् ॥ ६ ॥

अर्थः— पापरूपी अंधकाराचा नाश करणारें, मोक्षरूपी लक्ष्मीचें राहण्याचें मुख्य स्थान, मदनरूपी महासर्पास जिंकण्याचा मंत्र, चित्तरूपी हत्तीला स्वाधीन ठेवणारा सिंह, मदनरूपी मेघाला नाहींसा करणारा वायु, सगळ्या तत्त्वांचा प्रकाश करणारें, पंचेंद्रिय विषयाला

जिंकणारें असें जें ज्ञान; तें प्राप्त करून घे.

कुज्ञानसुज्ञानयोः फलं किम्?

अर्थः— चांगल्या आणि वाईट ज्ञानाचें फल काय?

भव्या नरा ज्ञानरथाधिरूढा।
व्रजन्ति शीघ्रं शिवपत्तनं च॥
अज्ञानिनो मौढ्यरथाधिरूढा।
व्रजन्ति श्वभ्राभिधपत्तनं वै॥ ७॥

अर्थः- ज्ञानरूपी रथावर बसलेले भव्य नर मोक्षरूपी नगरास लवकर जाऊन पोहोंचतात; आणि मूर्खपणा रूपी रथावर आरूढ झालेले अज्ञानी जीव नरक रूपी पट्टणास जातात.

ज्ञानिनः कीदृशाः?

अर्थः- ज्ञानी जन कसे होत?

ज्ञानवन्तो नरालोके।
तरयान्ति तारन्ति वै॥
जलयानसमा ज्ञेया।

भवाब्धौ जनतारकाः ॥ ८ ॥

अर्थः— ज्ञानी मनुष्य नौकेप्रमाणें आपणही तरतात व दुसऱ्यासही तारितात. यावरून ते संसाररूपी समुद्रांतून तरून जाण्यास मोठ्या नौकेसारखे होत.

सत्कविः कीदृशः ?

अर्थः— उत्तम कवि कसा असतो ?

मंदं निक्षिपते पदानि पुरतः शब्दं
समालोकते । तत्त्वार्थाहरणं हि का-
ङ्क्षति मुदालङ्कारमाकर्षति ॥ आदत्ते
सकलं सुवर्णनिचयं धत्ते रसाङ्गं ततो ।
दोषान्वेषणतत्परो विजयते चौरो-
पमः सत्कविः ॥ ९ ॥

अर्थः— उत्तम कवि जो आहे, तो श्लोकांत मोठमोठी पदें ठेवितो, पाहून पाहून योग्य शब्दांची रचना करितो, त्यांत तत्त्वार्थ आणण्याची इच्छा करितो, संतोषाकरितां अनेक प्रकारचे अलंकार आणितो, उत्तम वर्णांची रचना

कारितो, रस धारण करितो व दोष हुडकण्यांत तत्पर असतो, याच पदाचा · अर्थ– हळू हळू पावलें टाकितो कोठें कोण बोलत आहे तें पहातो, घरात काय तत्व असेल तें हुडकून काढतो, अलंकार (दागिने) गोळा करून घेतो, सोनें अंमळ तेवढेंच घेतो, ' आपण कोणास दिसूं नये म्हणून, वनस्पतीचा रस अंगास लावून घेतो व रात्रीच्या वेळीं हुडकत फिरतो. यावरून सत्कवि आणि चोर हे सारखेच होत. (सभ्यपरिहासाचें हें उदाहरण आहे, किंवा एका श्लोकांतच दोन अर्थ दाखवून दोघांचें वर्णन केलें आहे.)

तत्त्वातत्त्वविदो लोके ।
धन्याः सुज्ञानिनो नराः ॥
सर्वदा हृदये येषा- ।
मुदितो ज्ञानभास्करः ॥ १० ॥

अर्थः– ज्यांना तत्त्व कोणतें अतत्त्व कोणतें हें कळलें आहे आणि ज्यांच्या हृदयांत ज्ञानरूपी सूर्य उदय पावलेला

आहे असे ज्ञानी लोक मोठे धन्य होत.

अथ चारित्रवर्णनम्

चारित्रमित्युच्यमाने किम् ?

अर्थः— चारित्र ह्मणजे काय ?

रत्नत्रयमनुप्रेक्षा ।
दशलक्षणपरीषहाः ॥
मूलोत्तरगुणाः सर्वे ।
चारित्रलक्षणं मतम् ॥ १ ॥

अर्थः— रत्नत्रय (सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र) पाळणें, १२ अनुप्रेक्षांची भावना करणें, उत्तमक्षमा वगैरे दशविध धर्म पाळणें, २२ परिषह सोसणें, मूल आणि उत्तरगुण पाळणें हीं सर्व चारित्राचीं लक्षणें होत.

तपसः फलं किम् ?

अर्थः– तपाचें फल काय ?

यत्पूर्वार्जितकर्मशैलकुलिशं यत्काम-
दावानल- । ज्वालाजालजलं यदुग्रक-
रणग्रामाहिमन्त्राक्षरम् ॥ यत्प्रत्यूह-
तमःसमूहदिवसं यल्लब्धिलक्ष्मीलता- ।
मूलं तत् द्विविधं यथाविधि तपः
कुर्वीत वीतस्पृहः ॥ २ ॥

अर्थः— तप हें दोन प्रकारचें आहे. पूर्वार्जितकर्मरूपी पर्वतास भेदून टाकणारें वज्र आहे, कामरूपी दावानळाच्या अग्नीला शांत करणारें जल आहे. भयंकर अशा इंद्रियरूपी महासर्पास जिंकणारें मन्त्राक्षर आहे, पापरूपी अंधकारास नाहींसें करणारा सूर्य आहे, लक्ष्मी-रूपी वेलीचें मूल आहे. तर असें फल देणारें हें तप संसाराविषयीं निःस्पृह होऊन करावें.

चारित्रहीनो यतिः कीदृशः ?

चारित्रहीन यति कसा होय?

रात्रिश्चन्द्रमसा विनाऽब्जनिवहं नो
भाति पद्माकरो । यद्वत्पाण्डितलोक-
वर्जितसभा दन्तीव दन्तं विना ॥
पुष्पं गन्धविवर्जितं मृतपतिः स्त्रीये-
ह तद्वन्मुनि । श्चारित्रेण विना न
भाति सततं यद्यप्यमौ शास्त्रवान् ॥

अर्थः— चन्द्रावांचून रात्रीस शोभा नाहीं. कमलां-शिवाय सरोवर शोभत नाहीं. पंडिताशिवाय सभेस शोभा नाहीं. दांतावांचून हत्ती शोभत नाहीं. गंध नाहीं असें पुष्प शोभत नाहीं. जिचा पति मरण पावला आहे अशी स्त्री शोभत नाहीं. त्याप्रमाणें पुष्कळ शास्त्र जाणणारा असूनहीं चारित्र न पाळणारा मुनि शोभत नाहीं.

चारित्राचरणान्नृणां किं किं भवति?

अर्थः– चारित्र पाळिल्यापासून मनुष्यांस काय काय होतें?

देवः सर्वे वशं यान्ति ।
भजन्ति पत्कजं नृपाः ॥
चारित्राचरणान्नृणां ।
पुष्पमालेव पन्नगः ॥

अर्थः- चारित्र पाळणाऱ्या मनुष्यांस सर्प सुद्धां पुष्पमालेप्रमाणें होतो. एवढेंच नव्हे तर, सर्व देव वश होतात व राजेलोक त्यांच्या पदकमलांची सेवा करितात.

चारित्ररहिता जीवाः कीदृशाः?

अर्थः- चारित्रहीन जीव कसे होत?

चारित्रेण विना जीवाः ।
पृथिव्यां पशवो मताः ॥
असत्सद्वस्तुभक्षेण ।
पञ्चेन्द्रियप्रपोषणात् ॥

अर्थः- चारित्र न पाळणारे मनुष्य या पृथ्वीवर मोठे पशु होत. कारण ते पशूप्रमाणें चांगले व वाईटही पदार्थ भक्षण करून पञ्चेंद्रियांस पुष्ट करितात.

चारित्रेण विना मोक्षो भवति वा न?

अर्थः— चारित्राशिवाय मोक्ष होईल कीं नाहीं?

तीर्थेश्वरा जगज्ज्येष्ठा ।
यद्यपि मोक्षगामिनः ॥
तथापि पालितं तैश्च ।
चारित्रं मुक्तिहेतवे ॥

अर्थः— जगत्पूज्य तीर्थंकर हे जरी 'स्वात्रीनें' मोक्षगामी असतात, तथापि मोक्षाकरितां त्यांनीं चारित्र पाळिलेंच आहे.

अध्याय २ रा.

सप्तव्यसनानि कानि?

अर्थ— सात व्यसनें तीं कोणतीं?

द्यूतमांससुरावेश्या ।

खेटचौर्यपराङ्गनाः ॥
महापापानि सप्तैव ।
व्यसनानि त्यजेद्बुधः ॥ १ ॥

अर्थः— जुगार खेळणें, मांस खाणें,दारू पिणें, वेश्या संग करणें शिकार करणें चोरी करणें आणि परस्त्रीगमन ही सात व्यसनें महत्पापाचीं आहेत. हीं शहाण्यानें सोडून द्यावीं.

व्यसनैः के के नष्टाः?

अर्थः— सप्तव्यसनांनीं कोण कोण नाश पावले?

द्यूताद्धर्मसुताः पलादिह बको म-
द्याद्यदोर्नन्दनाः । चारुः कामुकया
मृगान्तकतया स ब्रह्मदत्तो नृपः ॥
चौर्यत्वाच्छिवभूतिरन्यवनितादोषा-
द्दशास्यो हतः । ह्येकैकव्यसनाद्धता
इति जनाः सर्वैर्न को नश्यति ॥ २ ॥

अर्थ—जुगार खेळून पांडव, मांस सेवनानें बक (एक राजा), दारू पिऊन यादव, वेश्यासंगानें चारुदत्त

शिकार करून ब्रह्मदत्त राजा, चोरी करून शिवभूति ब्राह्मण आणि परस्त्रीहरणानें रावण या प्रमाणें हे सगळे एकेक व्यसनानें नाश पावले. तेव्हां सातही व्यसनें ज्याच्या ठिकाणीं आहेत तो कां बरें नाश पावणार नाहीं.

जुगार.

द्यूतस्य फलं किम् ?

जुगाराचें फळ काय ?

धनवस्त्रविहीनाश्च ।
भाग्यहीनाः कुबुद्धयः ॥
द्यूतकारा नराः सर्वे ।
दृश्यन्ते धर्मवर्जिताः ॥ २ ॥

अर्थः— जगात जुगार खेळणारे जितके आहेत ते सर्व धनहीन, वस्त्रहीन, दुर्दैवी, नीचबुद्धीचे व धर्मभ्रष्ट असे झालेले दृष्टीस पडतात.

द्यूतादश विनश्यन्ति ।

धर्मः श्रीः सुमतिः सुखम् ॥
सत्यं शौचं प्रतिष्ठा च ।
शिष्टत्वं विश्वाससद्गती ॥ ४ ॥

अर्थः— धर्म, लक्ष्मी, उत्तमबुद्धि, सुख, खरेपणा, मनाचा निर्मलपणा, प्रतिष्ठा (थोरवी), सज्जनपणा, विश्वास आणि सद्गति हे दहा जुगार खेळण्यानें नाहींसे होतात.

द्यूतस्य बान्धवाः के ?
जुगाराचे बंधु कोण ?

विषादः कलहो बन्धः ।
कोपो मानः श्रमो भ्रमः ॥
पैशून्यं मत्सरः शोकः ।
सर्वे द्यूतस्य बान्धवाः ॥ ५ ॥

अर्थः— विषाद, कलह, कैद, क्रोध, गर्व, श्रम, भ्रम, दुर्जनता, मत्सर, शोक हे सगळे जुगाराचे आवडते बंधु होत.

नास्ति सत्यं च चौरेऽपि ।
न शौचं वृषलीपतौ ॥
मद्यपे सौहृदं नास्ति ।
द्यूते च त्रितयं न हि ॥ ६ ॥

अर्थः– चोराजवळ खरेपणा असत नाहीं. कामी मनुष्याजवळ शुद्धपणा असत नाहीं, दारू पिणाऱ्याजवळ मैत्री किंवा भीडमुरवत असत नाहीं, आणि जुगार खेळणाऱ्याजवळ तर हे तीन्ही असत नाहींत.

मांस.

मांसं न जायते भूम्यां न वृक्षे न च पर्वते ॥
जीवघातसमुत्पन्नं हेयं मांसं व्रतार्थिभिः ॥ ७

अर्थः– मांस हें कोठें भूमींत, किंवा पर्वतांत अगर एखादा वृक्ष वगैरे ठिकाणी उत्पन्न होत नाहीं; तर तें केवळ जीवघात करूनच आणावें लागतें. या करितां व्रतिकानें त्याचा त्याग करावा.

शुक्रशोणितसम्भूतं ।

त्रसाङ्गिसङ्कुलं पलम् ॥
तद्भोजी नरकं याति ।
यावच्चन्द्रदिवाकरौ ॥ ८ ॥

अर्थः– मांस हें शुक्र आणि शोणितापासून उत्पन्न होऊन त्रस जीवांनीं भरलेलें असतें. तें सेवणारा जीव जों पर्यंत चन्द्रसूर्य आहेत तों पर्यंत नरकांत पडणार.

मद्य.

न वेत्ति मद्यपानतः स्मरेण विव्ह-
लीकृतः । स्वमातरं स्वयोषिता स-
मानमेव मन्यते ॥ विवेकबुद्धिहीनतः
करोति देहिनां वधम् । ततो विवे-
किभिर्जनैः सुरा निषिध्यते सदा ॥ ९ ॥

अर्थः— मद्य पिणारा मनुष्य मद चढून बेशुद्ध होतो, व ह्यामुळें माता कोण व स्त्री कोण याचा विचारच करीत नाहीं. त्याचा विवेक व त्याची बुद्धि ही सर्व नष्ट होऊन तो वध करण्यास सुद्धां प्रवृत्त होतो.

या करितां विवेकी मनुष्य केव्हांही मद्यपान करीत नाहींत.

> वैरूप्यं व्याधिपीडा स्वजनपरिभवः
> कार्यकालातिपातो । विद्वेषो ज्ञान-
> नाशः स्मृतिधृतिहरणं विप्रयोगश्च
> सद्भिः ॥ पारुष्यं नीचसेवा कुलगिरि-
> चलनं धर्मकामार्थहानिः । कष्टं भो
> षोडशैते निरुपचयकरा मद्यपानस्य
> दोषाः ॥ १० ॥

अर्थः— मद्यपान करणारा मनुष्य 'प्रथम किती रूपवान् असलातरी त्यापासून' तो अगदीं विरूप होतो, त्याला अनेक प्रकारचे रोग होऊन पीडा होते, आपले लोक सुद्धां त्याचा अपमान करितात, त्याच्या हातून वेळेवर कोणतेंही काम होत नाहीं, सर्वांबरोबर द्वेष होतो, त्याचें ज्ञान नाहींसें होतें, स्मरण आणि धैर्य हीं निघून जातात, सज्जन लोक त्याची संगत करीत

नाहींत, तो मोठा कठोर होतो, नीचलोकांची सेवा करूं लागतो, कुलभ्रष्ट होतो, धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची हानि होते, याप्रमाणें मद्यपानापासून सोळा प्रकारचे अनर्थ होतात. या करितां लोकहो तुम्ही मद्यपान करूं नका.

वेश्या.

या विचित्रविटकोटिनिघृष्टा । मद्य-
मांसनिरताऽतिनिकृष्टा ॥ कोमला
वचसि चेतसि दुष्टा । तां भजन्ति
गणिकां न विशिष्टाः ॥ ११ ॥

अर्थः— जी उच्च नीच वगैरे सर्वजातींच्या कामी पुरुषांशीं संबंध ठेविते, मद्य व मांस सेवून जी अत्यंत निकृष्ट झालेली असते, बोलण्यांत अत्यंत कोमल असून मनाची मोठी दुष्ट असते अशा प्रकारें नीच जी गणिका तिला श्रेष्ठ नर सेवीत नाहींत.

तपो व्रतं यशो विद्या ।

कुलीनत्वं दमो दया ॥
छिद्यन्ते वेश्यया सद्यः ।
कुठारेण यथा लता ॥ १२ ॥

अर्थः— कुऱ्हाड जशी वेलीला तोडून टाकिते, त्याप्रमाणें ही वेश्या मनुष्याचें तप, व्रत, कीर्ति, विद्या, कुलीनपणा, दम, दया हीं सर्व समूळ नाहींशीं करिते.

विमोहयति या चित्तं ।
सन्दृष्टा दूरतोऽपि वा ॥
हेया सद्भिस्त्रिकरणेन ।
मद्यमांसविडम्बिता ॥ १३ ॥

अर्थः— जिला दूरून सुद्धां पाहिलें तरी जी पहाणारांस मोह उत्पन्न करिते अशी ती वेश्या मनानें, वचनानें व कायेनेंही सोडून द्या.

शिकार.

चरन्ति दूर्वां विचरन्ति कानने ।
पिबन्ति तोयान्यपरिग्रहाणि ॥ निर-

पराधान्हरिणाभिहन्ति ये । कथं तद-
न्यान्खलु तेऽप्यवन्ति ॥ १४ ॥

अर्थः— गवत आणि पाणी यावर आपला निर्वाह करून अरण्यांत हिंडणारे आणि कोणासही कांहींच उपद्रव न देणारे असे जे निरपराधी हरिण, त्यांस जे पापीलोक मारितात, ते इतर जीवांचें कसें बरें रक्षण करितील? या करितां ते लोक मोठे दुष्ट होत.

निरागसान्पराधीना- ।
न्नश्यतो भयविव्हलान् ॥
मुखलग्नतृणान्घ्नन्ति ।
ये ते व्रजन्ति श्वभ्रकं ॥ १५ ॥

अर्थः— निरपराधी, भयानें व्याकुळ होऊन पळणारे व तोंडांत तृण धरून असणारे अशा मृगांस जे मारिता-त, ते पापीलोक खरोखर नरकांत पडणारे होत.

चौर्य.

चौर्यकर्मरता ये ते ।

निविष्टाः शूलिकोपरि ॥
कण्ठरज्जुप्रबद्धास्ते ।
दृश्यन्ते निगडान्विताः ॥ १६ ॥

अर्थः— चोरी करणाऱ्यांस राजेलोक सुळावर चढवितात, फांशी देतात व निदान कैदेंत तरी ठेवितात.

निवसन्ति बन्दिगेहे ।
वस्त्रालङ्कारवर्जिताः पुरुषाः ॥
परधनहरणनियोगा-
चौरास्ते दुःखभोक्तारः ॥ १७ ॥

अर्थः— परद्रव्य हरण करणाऱ्यांस, बन्दीवासांत राहून निरंतर दुःखें भोगावीं लागतात, शिवाय, त्यानें चोरून आणिलेलीं वस्त्रें, अलंकार वगैरे सर्व राजा हिरावून घेतो.

परस्त्री.

वधं बन्धं धनभ्रंशः ।
शोकं तापं कुलक्षयम् ॥

आयासं कलहं मृत्युं ।
लभते पारदारिकः ॥ १८ ॥

अर्थः— परस्त्रीगमन करणाऱ्या विट पुरुषास कैद करितात, ठार मारितात, त्याचें द्रव्य लुटून नेतात, त्याचा कुलक्षय करितात, त्याला अनेक प्रकारें लोक संताप देतात, अशा रीतीनें पुष्कळ तंटे बखेडे होऊन शेवटीं त्या दुःखांतच त्याला मरावें लागतें.

सन्मार्गस्खलनं विवेकदलनं प्रज्ञाल-
तोन्मूलनम् । गाम्भीर्योन्मथनं स्वका-
यदमनं नीचत्वसम्पादनम् ॥ सध्या-
नावरणं स्वधर्महरणं पापप्रपापूरणम् ॥
धिक्कष्टं परदारवीक्षणमपि क्लेशा-
न्नभाजं नृणाम् ॥ १९ ॥

अर्थः- परस्त्रीशीं गमन करणें तरी राहूंदेच. पण, नुसतें तिच्याकडे पहाणें देखील फार घातक आहे. परस्त्रीस पहाणें ह्मणजे नीति, विचार, विद्वत्ता, गांभीर्य

हीं सर्व सोडून देऊन, व 'तिच्या ध्यासानें' आपला देह झिजवून नीचपणा मिळविणें होय! व धर्मध्यान आणि धर्म यापासून भ्रष्ट होऊन पापरूपी विहीरीस भरती आणणें होय. याकरितां कोणीही परस्त्रीस पाहूं नये. तें फार कष्ट देणारें आहे, ह्मणून त्याचा धिक्कार करावा.

भो गुरो, के जीवा नरकगामिनो भवन्ति?

अर्थः— हे गुरो, कोणते जीव नरकास जाणारे होत?

धर्मध्वंसकराः सदाऽतिकृपणा निन्द्या
रतास्तस्करा । रात्रौ भोजनतत्परा
विषयिणः क्रोधादिभिः पूरिताः ॥
ये दुष्टाः परदारवीक्षणपराः सम्य-
क्त्वहीना नरा । स्ते यान्ति नरकं
सदा व्यसनिनः पूजादिकर्मच्युताः ॥ २० ॥

अर्थः— धर्मास विघ्न आणणारे, अतिशय कृपणपणा-मुळें धर्मकार्यांत देखील द्रव्य न खर्चणारे, निन्द्य आचरण

करणारे, चोरी करणारे, रात्रीं भोजन करणारे, विषय सेवणारे, क्रोध, मान वगैरे कषायांनीं भरलेले, दुष्टस्वभावाचे परस्त्रीकडे पहाणारे आणि सम्यक्त्वहीन जे जीव, ते, व देवपूजा, गुरुसेवा वगैरे षट्कर्म न करणारे जीव नरकास जाणारे होत.

इति सप्तव्यसनवर्णनम्

श्रावक क्रिया.

ये नित्यं व्रतधर्मसंयमपराः सम्य
क्त्वसन्धारिणः । स्तत्त्वातत्त्वाविदो
दयारसयुताः सर्वज्ञपूजापराः । ये
सत्पात्रविधानदाननिपुणा रत्नत्रया-
लङ्कृताः । स्ते यान्ति क्रमतः सुरे-
न्द्रभवनं जैनागमोपासकाः ॥ ५१ ॥

अर्थ:— जैनागमाची उपासना करणारे जे भव्य लोक निरंतर व्रतें आणि संयम पाळितात, तत्त्व कोणतें अतत्त्व कोणतें हें जाणतात, दया रसानें भरलेले, सर्वज्ञ जो वीतराग त्याची पूजा करण्यांत उत्सुक असतात, सत्पात्रदान करितात, 'सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र' हीं यथाशक्ति पाळितात, ते श्रावक 'मरणानंतर' स्वर्गांत देव होऊन जन्मतात.

गुण वय तव सम पडिमा ।
दानं जलगालणं च अणत्थमिणम् ॥
दंसणणाणचरित्तं ।
किरिया तेवण्ण सावया भणिया ॥ २२ ॥

अर्थ:– गुण ह्मणजे मूलगूण ८ वय ह्मणजे व्रत १२ तव ह्मणजे तप १२ सम ह्म० साम्य (समभाव) १ पडिमा ह्म० प्रतिमा ११ दानं ह्म० दान ४ जलगालणं ह्म० जलगाळना क्रिया १ अणत्थमिणं ह्म० रात्रिभोजनत्याग दंसण ह्म० दर्शन १ णाण ह्म० ज्ञान १ चरित्तं ह्म०

चारित्र १ किरिया म्ह० क्रिया तेवन्न म्ह० त्रेपन्न, सावया म्ह० श्रावकांच्या भणिया म्ह० सांगितल्या आहेत.

अष्टौ मूलगुणाः के?

अर्थः— आठ मूलगुण ते कोणते?

मद्यमांसमधुत्यागः ।
सहोदुम्बरपञ्चकैः ॥
अष्टौ मूलगुणानाहु ।
र्गृहिणां श्रमणोत्तमाः ॥ २३ ॥

अर्थः— मद्य, मांस, मध आणि पांच प्रकारचीं उदुंबरांचीं फळें यांचा त्याग करणें म्हणजे हे पांच पदार्थ न सेवणें यास श्रावकांचे आठ मूलगुण म्हणतात.

एकादश प्रतिमाः काः?

अर्थः—अकरा प्रतिमा त्या कोणत्या?

दंसणवदसामायिय- ।
पोसहसचित्तराइभुत्ती य ॥
बह्मारम्भपरिग्गह ।

अणुपणमुद्दिट्ठ देसविरदे दे ॥ २४ ॥

अर्थः— दर्शनिक, व्रतिक, सामायिक, प्रोषधोपवास, सचित्तत्याग, रात्रिभोजनत्याग, ब्रह्मचर्य, आरंभ-(कृषि, व्यापार, उद्योग वगैरे) त्याग, अनुमतित्याग, आणि उद्दिष्टत्याग ह्या अकरा श्रावकाच्या प्रतिमा होत. यांतील कोणत्याही एका प्रतिमेत असणारांसच श्रावक ह्मणतां येईल. या अकराही प्रतिमा चौदा गुणस्थानांपैकीं देशविरतनांवाच्या पांचव्या गुणस्थानांत असतात.

अणुव्रतानि कानि ?

अर्थः— अणुव्रतें तीं कोणती ?

अहिंसा चानृतास्तेय- ।
ब्रह्मचर्यापरिग्रहाः ॥
अणुव्रतानि साराणि पञ्चैव ।
गृहिणां खलु ॥ २५ ॥

अर्थः— जीवहिंसा, लबाडी, चोरी आणि परस्त्री न करणें. व परिग्रह (धन, धान्य, दास, दासी, हत्ती, घोडा,

वगैरे) कमी करणें हीं पांच अणुव्रतें होत. हीं गृहस्थांनी पाळिलीं पाहिजेत.

गुणव्रतानि शिक्षाव्रतानि कानि ?

अर्थ:- गुणव्रतें आणि शिक्षाव्रतें तीं कोणतीं ?

दिग्देशानर्थदण्डं च ।
सामायिकं च प्रोषधम् ॥
भोगोपभोगसंख्यान-
मतिथेर्दानमुत्तमम् ॥ २६ ॥

अर्थ:- दिग्व्रत (अमुक दिशेस न जाण्याची प्रतिज्ञा.) देशव्रत (अमुक देशांत किंवा अमुक योजन प्रदेशाच्या बाहेर न जाण्याची प्रतिज्ञा.) अनर्थदण्ड-त्याग (विनाकारण वनस्पती वगैरे न तोडणें इत्यादि.) हीं तीन गुणव्रतें होत. आणि सामायिक करणें, प्रोषधोपवास करणें, भोगोपभोगांची इयत्ता करणें व अतिथीस दान देणें हीं चार शिक्षाव्रतें होत.

सामायिकस्य लक्षणं किम् ?

अर्थः— सामायिकाचें लक्षण काय ?

समता सर्वभूतेषु ।
संयमः शुभभावना ॥
आर्त्तरौद्रपरित्याग- ।
स्तद्धि सामायिकं मतम् ॥ २७ ॥

अर्थः— प्राणिमात्रांच्या ठिकाणीं समभाव ठेवणें (राग व द्वेष न करणें) इंद्रियें स्वाधीन ठेवणें, शुभ भावना चिंतणें [कोणाचें वाईट न चिंतणें] आर्त्त आणि रौद्र ध्यान न करणें इत्यादि सर्व सामायिकाचें लक्षण होय.

प्रोषधस्य किं लक्षणम् ?

अर्थः— प्रोषधाचें लक्षण काय ?

पर्वदिनेषु चतुर्ष्वपि ।
मासे मासे स्वशक्तिमनिगुह्य ॥
प्रोषधनियमविधायी ।
प्रणिधिपरः प्रोषधानशनः ॥ २८ ॥

अर्थः– दर महिन्याच्या दोन अष्टमी आणि दोन चतुर्दशी अशा चार पर्वतिथीला आपली शक्ति न छपवितां प्रोषधोपवास करून (उपवासाच्या पहिल्या व नंतरच्या दिवशीं एक भुक्त करणें यास प्रोषधोपवास ह्मणतात.) शुभध्यानामध्यें तत्पर असणें ह्यास चौथी प्रोषधोपवास प्रतिमा ह्मणतात.

सचित्तत्यागिनो लक्षणं किम् ?

अर्थः– सचित्त त्याग प्रतिमाधारी कोण ?

फलमूलशाकशाखा- ।
करीरकंदप्रसूनबीजानि ॥
नामानि योऽत्ति सोऽयं ।
सचित्तविरतो दयामूर्तिः ॥ ॥ २९ ॥

अर्थः– जो दयाळू गृहस्थ, फळ, मूळ, भाजी, डाहळी, उंसाच्या किंवा वेळूच्या गांठी, कंद, फूल, आणि बी, हीं न पिकलेलीं अथवा न शिजविलेलीं खात नाहीं, तो सचित्तत्याग प्रतिमधारी श्रावक होय.

रात्रौ भुंजानः परभवे कीदृशाः स्युरिति ?

अर्थ:— रात्रीं भोजन करणारे जीव अन्यजन्मीं कसे होतात.

अन्धाः कुब्जकवामनातिविकला
अल्पायुषः प्राणिनः । शोकक्लेशवि-
शाददुःखबहुलाः कुष्टादिरोगान्विताः ॥
दारिद्र्योपहता अतीवचपला मन्दा-
दराः स्युर्ध्रुवं । रात्रौ भोजनलम्पटाः
परभवे तिर्यक्षु श्वभ्रादिषु ॥ २० ॥

अर्थ:— आंधळे, पांगळे, ठेंगणे, विकल (हात, पाय, नेत्र, कान वगैरे अवयवांपैकीं कित्येक अवयव ज्यांस नसतात ते विकल होत.) अल्पायुषी, पुत्रमित्र भार्यादिकांच्या वियोगापासून शोक करणारे, दुःखी, कुष्ट वगैरे रोगांनीं पीडिलेले, दरिद्री, मन्दबुद्धीचे, अप्रतिष्ठित असे जितके जीव या जगीं दृष्टीस पडतात, ते सर्व पूर्वजन्मीं रात्रिभोजन करूनच तसे झालेले आहेत.-

रात्रिभोजन करणारे जीव तिर्यंच व नरक गतीस जातात.

ब्रह्मचारी कीदृग्विधो भवति ?

अर्थः— ब्रह्मचारी कसा असतो ?

बालवृद्धयुवत्यश्च ।
सवित्रीभगिनीसुताः ॥
त्रिकरणैर्मनुते योऽसौ ।
ब्रह्मचारी जिनैर्मतः ॥ २१ ॥

अर्थः- जो काया वाचा मनेंकरून, परस्त्री लहान असल्यास बहीण किंवा मुलीप्रमाणें समजतो व मोठी असल्यास मातेप्रमाणें समजतो तो ब्रह्मचारी होय.

आरम्भतः किं भवति ?

अर्थः—प्रारंभ [कृषि अगर जीववध होण्यास कारण अशा पदार्थांचा व्यापार] करण्यानें काय होतें ?

आरम्भतो जीवदया प्रणष्टा ।
दयाविनाशे खलु धर्मनाशः ॥
सर्वं गतं धर्मगते नराणां ।

ततश्च आरम्भ अरे हि त्याज: ॥ ३२ ॥

अर्थ:- कृषि वगैरे पाप उद्योग करण्यापासून जीवदया नाहींशी होते, दयेचा नाश झाला ह्मणजे धर्मनाश होतो, आणि धर्मनाश झाला ह्मणजे सर्वच कांहीं नाश झालें असें समजलें पाहिजे. या करितां पापाचे उद्योग कधींहि करूं नये.

परिग्रहत्यागप्रतिमा का ?

अर्थ:- परिग्रहत्याग नांवाची प्रतिमा कोणती ?

बाह्यान्तरविभेदेन ।
परिग्रहा जिनैर्मताः ॥
तेषां त्यागस्तथा सङ्ख्या ।
प्रतिमा नवमी च सा ॥ ३३ ॥

अर्थ:— धन, धान्य, दासी, दास वगैरे बाह्य परिग्रह आणि मिथ्यात्व वगैरे आंतर परिग्रह हे सोडणें अथवा यांची मोताद करणें यास परिग्रहत्याग प्रतिमा ह्मणतात.

दशमप्रतिमाया लक्षणं किम् ?

अर्थः— दहाव्या प्रतिमेचें लक्षण काय ?

अनुमतिरारम्भे वा ।
परिग्रहे चैहिकेषु कर्मसु वा ॥
नास्ति खलु यस्य समधी- ।
रनुमतिविरतः स मन्तव्यः ॥ २४ ॥

अर्थः— आरंभ ह्मणजे शेतकी व्यापार वगैरे, परिग्रह ह्मणजे धनधान्य वगैरे आणि ऐहिक ह्मणजे लग्न-कार्य वगैरे कामांत जो समबुद्धीचा मनुष्य संमति देत नाहीं तो दहाव्या प्रतिमेचा श्रावक होय.

एकादशप्रतिमाधारकः कः ?

अर्थः— अकराव्या प्रतिमेचा श्रावक कोण ?

गृहतो मुनिवनमित्वा ।
गुरूपकण्ठे व्रतानि परिगृह्य ॥
भैक्ष्याशनस्तपस्य- ।
न्नुत्कृष्टश्चेलखण्डधरः ॥ २५ ॥

अर्थः— घरांतून निघून मुनी राहतात अशा वनांत

जाऊन जो गुरूजवळ व्रतें घेतो, भिक्षेनें आहार घेऊन तपश्चरणांत निमग्न असतो, आणि फक्त लंगोटी व अपुरतें वस्त्र ठेवितो, तो उत्कृष्ट अकराव्या प्रतिमेचा श्रावक होय.

सामायिकं विधायोच्चै- ।
र्गन्तव्यं पञ्चसद्मसु ॥
यल्लब्धं प्रासुकान्नं त- ।
द्भोक्तव्यं व्रतधारकैः ॥ ३६ ॥

अर्थः— व्रतिकानें उत्तम प्रकारें सामायिक करून, नंतर 'भिक्षेकरितां' पांच घरें हिंडावीं; त्यांत जें कांहीं प्रासुक (निर्दोष) अन्न मिळेल तेवढेंच सेवन करावें.

यस्मिन्देशे न तीर्थाणि ।
न चैत्यानि न धर्मिणः ॥
तस्मिन्देशे न गन्तव्यं ।
स्वधर्मप्रतिपालकैः ॥ ३७ ॥

अर्थः— ज्या देशांत तीर्थें नाहींत, जिनबिंब नाहींत,

व धार्मिक लोकहि नाहींत, त्या देशांत स्वधर्मप्रतिपालन करणारानें जाऊं नये. कारण, तेथें धर्मभ्रष्ट होण्याचा संभव असतो.

अङ्गवङ्गकलिङ्गान्ध्र- ।
काश्मीरकरहाटके ॥
विना यात्रां न गन्तव्यं ।
सौराष्ट्रे मगधेऽपि च ॥ ३८ ॥

अर्थः– अंग [गंगानदीच्या पूर्वेस एक देश आहे] वंग [बंगाल], कलिङ्ग [ओरिसा प्रांताच्या दक्षिणेस गोदावरीच्या मुखापर्यंत जो प्रदेश त्याला पूर्वी अलिंगदेश ह्मणत असत.] आन्ध्र [पूर्वसमुद्राच्या घाटाखालचा प्रदेश. जेथें तेलंग लोकांची वसति आहे.] काश्मीर, कऱ्हाड, सौराष्ट्र (काठेवाड. सौराष्ट्र देशाची राजधानी द्वारका.) व मगध इतक्या देशांत व्रतीकानें यात्रे शिवाय जाऊं नये.

दानप्रकरणम् ।

अहो धर्माचार्य दानभेदान्निरूप्यताम् ।

अर्थः– हे धर्माचार्य; दानाचे भेद सांग.

आहाराभयभैषज्य- ।
शास्त्रदानं जिनैर्मतम् ॥
कुदानं दशधा हेयं ।
संसारपरिवर्द्धनम् ॥ ३९ ॥

अर्थः— अन्न, अभय, औषध, शास्त्र हीं चार दानें जिनास संमत आहेत. बाकी दहा प्रकारचें दान संसार वाढविण्यास कारण होत असल्यामुळें तें करूं नये.

कुदानं किम्?

अर्थः– कुदान कोणतें?

हेम तैलास्तथा नागो ।
रथो दासी गृहं मही ॥
कन्या च कपिला नारी ।

कुदानानि दशैव हि ॥ ४० ॥

अर्थः– सोनें, तिळ, हत्ती, रथ, दासी, घर, भूमि, कन्या, गाय आणि स्त्री हीं दहा कुदानें होत.

दानस्य फलं किम्?

अर्थः— दानाचें फळ काय?

ज्ञानवान् ज्ञानदानेन ।
निर्भयोऽभयदानतः ॥
अन्नदानात्सुखी नित्यं ।
निर्व्याधिर्भेषजाद्भवेत् ॥ ४१ ॥

अर्थः– ज्ञानदानापासून ज्ञानी, अभयदानापासून निर्भय, अन्नदानापासून सदा सुखी आणि औषधदानापासून निरोगी होतो.

दानचतुष्टयस्य फलं कैर्लब्धम्?

अर्थः— चार दानांचें फळ कोणांस प्राप्त झालें?

कौंडेशो ज्ञानदानेना- ।
हारेणैव यशोमतिः ॥

औषधैर्वज्रदत्ताख्यो ।
दयादानेन भूधरः ॥ ४२ ॥

अर्थः— कौंडेशास ज्ञानदानाचें फळ मिळालें, यशोमतीस अन्नदानाचें फळ मिळालें, वज्रदत्तास औषधदानाचें आणि भूधर म्हणून कोणी होता त्यास अभयदानाचें फळ मिळालें.

पात्रभेदा निरूप्यताम् ॥

अर्थः— पात्राचे भेद सांगा.

उत्तमपत्तं साहू ।
मज्झमपत्तं च सावया भणिया ॥
अविरदसम्माइट्ठी ।
जहण्णपत्तं मुणेयव्वम् ॥ ४३ ॥

अर्थः— उत्तम पात्र साधु, मध्यम पात्र श्रावक आणि जघन्य पात्र अविरत सम्यग्दृष्टि.

देहे निर्ममता गुरौ विनयता नित्यं
श्रुताभ्यासता । चारित्रोज्ज्वलता

महोपशमता संसारनिर्वेगता ॥
अन्तर्बाह्यपरिग्रहत्यजनता धर्मज्ञता
साधुता । साधो साधुजनस्य लक्षण-
मिदं संसारविच्छेदनम् ॥ ४४ ॥

अर्थ:— देहाविषयीं ममत्व न करणें, गुरूच्या ठिकाणीं विनय करणें, नेहमीं शास्त्राभ्यास करणें, निर्मल चारित्र पाळणें, शांत परिणाम ठेवणें, संसाराविषयीं उदास असणें, आंतर बाह्य परिग्रह सोडणें, धर्म जाणणें हीं सर्व साधूंचीं लक्षणें होत. हीं लक्षणें संसाराचा नाश करणारीं आहेत.

देवशास्त्रगुरूणां च ।
भक्तिर्दानं दयार्चनम् ॥
मदाष्टव्यसनैर्हीनिः ।
श्रावकः कथितो बुधैः ॥ ४५ ॥

अर्थ:— देव, शास्त्र, गुरूंची भक्ति व पूजा करणारा, दान व दया करणारा, आठ मद व सप्तव्यसनें नसलेला जो, तो श्रावक होय.

मनसा वपुषा वाचा ।
तत्त्वश्रद्धानमन्वहम् ॥
करोति न व्रताचारं ।
जघन्यः कथितो बुधैः ॥ ४६ ॥

अर्थः– मनानें, कायेनें व वाणीनें तत्त्वावर श्रद्धान ठेवितो, पण व्रतें पाळीत नाहीं, तो जघन्य श्रावक होय.

सत्पात्रदानेन भवेद्धनाढ्यो ।
धनप्रकर्षेण करोति पुण्यम् ॥
पुण्याधिकारी दिवि देवराजः ।
पुनर्धनाढ्यः पुनरेव भोगी ॥ ४७ ॥

अर्थः– सत्पात्रदानानें हा जीव श्रीमंत होतो. नंतर पुष्कळ द्रव्य सत्कृत्यांत खर्च करून पुण्य मिळवितो. जो पुण्यवान् झाला तो मरणानंतर स्वर्गलोकींचा राजा होतो. पुनः इहलोकीं श्रीमंत होतो व अनेक प्रकारचे सुखोपभोग भोगितो.

कुपात्रदानेन भवेद्दरिद्री ।

दारिद्र्यदोषेण करोति पापम् ॥
पापाधिकारी नरकं च गच्छे- ।
त्पुनर्दरिद्री पुनरेव पापी ॥ ४८ ॥

अर्थः– कुपात्रीं दान देणारास दारिद्र्य प्राप्त होतें. दारिद्र्यामुळें अनेक पातकें करावीं लागतात. पापाधिकारी जीव नरकास जातो. अशा क्रमानें पुनः पुनः तो जीव दरिद्री व पापी होतो.

जलगालनविधि.

षट्त्रिंशदंगुलायामं ।
चतुर्विंशतिविस्तृतम् ॥
तद्वस्त्रं द्विगुणीकृत्य ।
गालयेज्जलमुत्तमम् ॥ ४९ ॥

अर्थः— छत्तीस अंगुळें लांब व चोवीस अंगुळें रूंद असें द्विगुण ह्मणजे दुपदरी वस्त्र घेऊन त्यांन जल

गाळावें तेव्हां तें श्रावकांस पिण्यास योग्य होतें.

मुहूर्त. गालितं तोयं ।
प्रासुकं प्रहरद्वयम् ॥
उष्णोदकमहोरात्रं ।
ततः सम्मूर्च्छितं भवेत् ॥ ५० ॥

अर्थ:— वस्त्रानें गाळिलेलें जल एक मुहूर्त म्हणजे सव्वा तास पर्यंत शुद्ध असतें, प्रासुक जल दोन प्रहर पर्यंत, उष्णोदक म्हणजे तापविलेलें चोवीस तास पर्यंत शुद्ध असतें. त्यानंतर त्यांत सन्मूर्च्छन जीव उत्पन्न होतात.

वासयेत्पाटलीपुष्पै- ।
र्मूलैरौशीरकैस्तथा ॥
एलाकर्पूरकाभ्यां तु ।
चन्दनादिसुवस्तुना ॥ ५१ ॥

अर्थ:— पाडळीचें फूल, काळ्या वाळ्याची मुळी, वेलदोडा, कर्पूर, चन्दन वगैरे सुगंध द्रव्यांनीं सुवासिक

केलेलें जल प्रासुक समजावें.

> अगालितं जलं येन ।
> पीतमञ्जलिमात्रकम् ॥
> सप्तग्रामदहोद्भूतं ।
> पापं तस्य प्रजायते ॥ ५२ ॥

अर्थः- जो मनुष्य न गाळिलेलें जल एक ओंजळ भर जरी प्राशन करील, तर त्यास सात गांव जाळिल्या इतकें पातक लागतें.

> देवपूजा दया दानं ।
> तीर्थयात्रा जपस्तपः ॥
> शास्त्रं परोपकारत्वं ।
> मर्त्यजन्मफलाष्टकम् ॥ ५३ ॥

अर्थः— देवपूजा, दया, दान, तीर्थयात्रा, जप, तप, शास्त्राभ्यास आणि परोपकार हीं आठ मनुष्यजन्माचीं फळें होत.

> भोजने वमने स्नाने ।

मैथुने मलमोचने ॥
सामायिके जिनार्चायां ।
गृहिणां मौनसप्तकम् ॥ ५४ ॥

अर्थः— सामायिक, जिनपूजा स्तोत्र, भोजन, वमन, स्नान, मैथून व मलमूत्रत्याग हें करितांना गृहस्थांनीं मौन धरावें.

अष्टाङ्ग जिननाथस्य ।
पञ्चाङ्ग गुरुपादयोः ।
साधर्मिणां शिरोनत्या ॥
प्रणामं कुरुते सुधीः ॥ ५५ ॥

अर्थः— जिनेश्वराप्रत अष्टाङ्ग, गुरूस पञ्चांग, समानधर्मी श्रावकांस " उभे राहूनच पण " लऊन नमस्कार करावा.

हस्तौ पादौ शिरश्चोरः ।
कपोलयुगलं तथा ॥
मनोवाक्कायसंशुध्या ।

प्रणामोऽष्टाङ्ग इष्यते ॥ ५६ ॥

अर्थः– १ हात, २ पाय, ३ मस्तक, ४ ऊर, ५ गाल, ६ मनःशुद्धि, ७ वचनशुद्धि, ८ कायशुद्धि-पूर्वक जो नमस्कार तो अष्टांग नमस्कार जाणावा.

अध्याय तिसरा.

कषाय.

कषायाः के?

कषाय कोणते?

क्रोधो मानस्तथा माया लोभोऽप्येते चतु-
र्विधाः । चतुर्भागैर्विभक्ताश्च भवन्तीत्येव
षोडश ॥ १ ॥

अर्थः—क्रोध, मान, माया आणि लोभ या चार

विकारांस कषाय म्हणतात. अनंतानुबंधी, अप्रत्याख्यान; प्रत्याख्यान व संज्वलन असे प्रत्येकाचे चार चार भेद मिळून ते १६ होतात.

जं अज्जियं चरित्तं देसूणं पुव्वकोडीओ ।
तं पि कषायमत्तो हारइ जीवो मुहुत्तेण ॥ २ ॥

अर्थः— पुष्कळ वर्षें तपश्चर्या करून जितकें कांहीं चारित्र संपादिलें असतें तितकें सर्वहि काषायांपासून एका क्षणांतच नाहींसें होतें.

क्रोधाद् व्याघ्रो भवति मनुजो
मानतो रासभः स्यात् । मायाया-
स्त्रीधनसुखरहितो लोभतः सर्पयोनिः ॥
कामात्पारापतिरिति भवेदत्र सम्ब-
न्धभावात् । मोहान्मोही परिजनसु-
तस्त्रीसुताबान्धवेषु ॥ ३ ॥

अर्थः— क्रोधी मनुष्य मरणानंतर व्याघ्र होऊन व अहंकारी मनुष्य गाढव होऊन जन्मतो. कपटी

मनुष्य स्त्री, धन वगैरे सुखांस अंतरतो. लोभी मनुष्यास सर्पयोनि व कामी मनुष्यास कबूतराचें जन्म प्राप्त होतें. मोही जन अन्यजन्मीं इष्टमित्र, पुत्र, स्त्री, बंधुजन इत्यादिकांविषयीं अधिकच मोह पावतो.

लेश्या

षण्णां लेश्यानां लक्षणानि कानि ?

अर्थः— सहा लेश्यांचीं लक्षणें कोणतीं ?

अतिरौद्रः सदा क्रोधी ।
मत्सरी धर्मवर्जितः ॥
निर्दयो वैरसंयुक्तः ।
कृष्णलेश्याभिसंयुतः ॥ ४ ॥

अर्थः— दुसऱ्याचें वाईट इच्छिणें व चांगलें झालेलें न पहाणें अथवा भयंकर कृत्य करणें, सदा क्रोधांत

असणें, मत्सर करणें, धर्महीन व निर्दय होणें, वैर करणें हीं सर्व कृष्णलेश्या असलेल्या मनुष्याचीं लक्षणें होत.

अलसो मन्दबुद्धिश्च ।
स्त्रीलुब्धश्च प्रपञ्चकः ॥
कातरश्च सदा मानी ।
नीललेश्याभिधीयते ॥ ५ ॥

अर्थः– आळसी, मंदबुद्धीचा, स्त्रीलुब्ध, प्रपंचांत फारच मोहित असणारा, अधीर, भित्रा, अहंकारी असा जो मनुष्य त्याची नीललेश्या जाणावी.

शोकातुरः सदा रुष्टः ।
परनिन्दात्मशंसकः ॥
सङ्ग्रामे प्रार्थ्यते मृत्यु ।
र्लेश्या कापोतिका मता ॥ ६ ॥

अर्थः– शोक करणें, क्रोध, परनिंदा व आत्मप्रशंसा करणें, युद्धांत मरणाची इच्छा करणें हीं कापोत

लेश्येचीं लक्षणें होत.

विद्वांश्च करुणायुक्तः ।
कार्याकार्यविचारकः ॥
लाभालाभे सदा प्रीतः ।
पीतलेश्याऽभिधीयते ॥ ७ ॥

अर्थः— विद्वान, दयालु, विचारी, लाभ व हानि समानच मानून संतोषांत असणारा अशा पुरुषाची पीतलेश्या जाणावी.

क्षमावांश्च सदा त्यागी ।
देवतार्चन उद्यमी ॥
शुचिर्भूतो दयानन्दो ।
पद्मलेश्यायुतो नरः ॥ ८ ॥

अर्थः— क्षमा भाव धरणें, दान देणें, जिनपूजा करणें, देह व मन शुद्ध ठेवणें, दया करण्यांत आनंद मानणें ही सर्व लक्षणें पद्मलेश्येचीं जाणावीं.

पक्षपातविनिर्मुक्तः शोकनिद्राविवर्जितः ॥

रागद्वेषभयं नास्ति शुक्ललेश्यायुतो नरः ॥ ९ ॥

अर्थः— पक्षपात न करणारा, शोक, निद्रा, राग, द्वेष, भय वगैरे ज्यास नाहींत अशा महापुरुषास शुक्ल-लेश्या असते.

किण्णीय जाय किरये णीलाए थाव-
ए होदी ॥ काओए तिरियगए पी-
ताए माणसे होइ ॥ पम्माए देवलोए
सुक्काए सासयं ठाणम् ॥ एवं गमई
जीवो लेस्साजुत्तो छस्सु ठाणेसु ॥ ११ ॥

अर्थः— कृष्ण लेश्येनें नरकगति, नीलानें स्थावर गति, कापोतानें तिर्यचगति, पीतानें मनुष्य गति, पद्मानें देवगति आणि शुक्लानें मोक्षगति या प्रमाणें सहा लेश्यांच्या योगानें जीवांस सहा प्रकारच्या गति होतात.

विरोधिता साधुजनस्य लोके ॥

सरोषता मूर्खजनप्रसङ्गः ॥
अतीव रोषः कटुका च वाणी ।
नरस्य चिन्हं नरकागतस्य ॥ १२ ॥

अर्थः— सज्जनाशीं विरोध करून मूर्खांशीं प्रसंग ठेवणें, रोष करणें, कठोर भाषण करणें हीं सर्व चिन्हें नरकांत मरण पावून येथें जन्मलेल्या नराचीं होत.

बह्वाशो नैव सन्तुष्टो ।
मायालुब्धः क्षुधाधिकः ॥
अभक्ष्यभक्षणे दक्ष- ।
स्तिर्यग्योनेः समागतः ॥ १३ ॥

अर्थः— पुष्कळ आशा करणारा, कधींहि संतुष्ट न असणारा, कपट व लोभ करणारा, ज्याची भूक मोठी. अभक्ष्य भक्षण करणारा मनुष्य तिर्यंचयोनीपासून आलेला समजावा.

अणुलोभी विनीतश्च दयादानरुचिर्मुहुः ॥
महसँश्चोत्तमश्चैव मनुष्यादागतो नरः ॥ १४ ॥

अर्थ:— किंचित् लोभ ठेवणारा, विनयानें वागणारा, दया करणें व दान देणें याविषयीं ज्यास फारच आवड आहे असा, हासत मुखानें असणारा व उत्तमस्वभावी असा जो मनुष्य, तो पूर्वजन्मींहि मनुष्यच होता असें जाणावें.

स्वर्गच्युतानामिह जीवलोके ।
चत्वारि चिन्हानि वसन्ति देहे ॥
ज्ञानप्रसङ्गो मधुरा च वाणी ।
देवार्चनं सद्गुरुसेवनं च ॥ १५ ॥

अर्थ:— ज्ञानाचा अभ्यास करणें मधुर भाषण करणें, देवपूजा करणें आणि सद्गुरूची सेवा करणें हीं ४ चिन्हें स्वर्गांतून च्यवून येथें जन्मलेल्या मनुष्याचीं होत.

ध्यान.

राज्योपभोगशयनासनवाहनेषु ।

स्त्रीगन्धमाल्यवररत्नविभूषणेषु ॥
अत्याभिलाषमतिमात्रमुपैति मोहात् ।
ध्यानं तदार्तमिति तत्प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १६

अर्थः— राज्योपभोग, उत्तम शयन, आसन, वाहनें (हत्ती, घोडा, पालखी वगैरे.) स्त्रिया, गन्ध [अत्तर वगैरे] माळा, उत्तम रत्नें इत्यादि जे भोगोपभोगाचे पदार्थ; त्यांच्यांत मोहामुळें अतिशय अभिलाष ठेवणें अगर ते आपणास नाहींत म्हणून तळमळणें त्यास 'आर्तध्यान' म्हणतात.

संच्छेदनैर्दहनताडनतापनैश्च ।
बन्धप्रहारदमनैश्च विकृन्तनैश्च ॥
यस्येह रागमुपयाति न चानुकम्पा ।
ध्यानं तु रौद्रमिति तत्प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १७

अर्थः— तोडणें, जाळणें, मारणें, संताप देणें, बंदींत ठेवणें, दमविणें, कापणें इत्यादि दुःखदायक कृत्यें करून ज्यास दया तर येत नाहीं; पण अधिक संतोष

होतो अशा प्रकारचा जो मनाचा परिणाम त्यास 'रौद्रध्यान' म्हणतात.

सुत्रार्थमार्गणमहाव्रतभावना च ।
पञ्चेन्द्रियोपशमताऽतिदयार्द्रभावः ॥
बन्धप्रमोक्षगमनागतिहेतुचिन्ता ।
ध्यानं तु धर्म्यमिति तत्प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १८ ॥

अर्थः— जैनशास्त्रांतील सूत्रांच्या अर्थाचा विचार करणें (स्वाध्याय करणें) ,महाव्रतांची भावना करणें, पंच इंद्रियें स्वाधीन ठेवणें, दया युक्त परिणाम ठेवणें, 'जीवास बंध कसा होतो, मोक्ष कशानें होतो, चतुर्गतींत येणें जाणें कशानें होतें, इत्यादि विचार करणें यास धर्म्मध्यान म्हणतात

यस्येन्द्रियाणि विषयेषु निवर्तितानि ।
सङ्कल्पयप्यथ विकल्पविकारदोषम् ॥ (?)
योगैः सदा त्रिभिरहर्निभृतान्तरात्मा ।
ध्यानं तु शुक्लमिति तत्प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १९ ॥

अर्थः— ज्याचीं इंद्रियें संपूर्णपणें विषयांपासून निवृत्त

झाली आहेत, संकल्प विकल्प वगैरे जे विकार त्यांहीकरून रहित असे जे तीन योग (मनोयोग, वचोयोग काययोग) यांहीकरून युक्त असा अंतरात्मा ज्याचा आहे त्याच्या ध्यानास ' शुक्लध्यान ' ह्मणतात.

जिनबिंबं जिनागारं ।
जिनयात्रा प्रतिष्ठितम् ॥
दानपूजा च सिद्धान्त ।
लेखनं सप्तक्षेत्रकम् ॥ २० ॥

अर्थः— जिनबिंब, जिनमंदिर, जिनयात्रा, [उत्सव करणें, रथ फिरविणें, वगैरे], जिनबिंबाची प्राणप्रतिष्ठा करणें, दान देणें, शास्त्र लिहविणें हीं सात क्षेत्रें होत. ह्मणजे या सात ठिकाणीं धनिक श्रावकांनीं द्रव्य खर्चावें. तेणें करून अन्यजन्मीं अनेक प्रकारचीं सुखें प्राप्त होतात

जिनेन्द्रसद्दर्शनतो नराणा· ।

अनेकजन्मार्जितपापनाशः ॥
स्यात्सर्वदा मङ्गलसौख्यराशिः ।
स्वर्गापवर्गाधिपतिश्च नूनम् ॥ २१ ॥

अर्थः— जिनदर्शनापासून, मनुष्यानें अनेक जन्मांत आचरिलेल्या पापांचा नाश होतो. व शेवटीं स्वर्ग-मोक्ष इत्यादि पदांची निश्चयेंकरून प्राप्ति होते.

सद्धर्ममार्गं विगतान्तरायं ।
दिनं दिनं प्रेरयते नराणाम् ॥
गुरौ प्रदृष्टे मुनिगौतमाद्याः ।
स्फुरन्ति चित्ते खलु वीतरागाः ॥ २२ ॥

अर्थः— सद्‌गुरु आपल्या सेवकास प्रतिदिवशीं उपदेश देऊन सद्धर्माच्या मार्गास लावितो. सद्‌गुरूच्या दर्शनानें गौतम वगैरे मुनीश्वर व वीतराग यांची स्फूर्ति होते.

यानि यानि कृतान्येव पापानि पूर्वजन्मानि
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदेपदे २३

अर्थः— आपण पूर्वजन्मीं जीं जीं पातकें केलीं आहेत, तीं तीं सर्व, जिनेश्वरास प्रदक्षिणा फिरतेवेळीं पावलो-पावलीं नाश पावतात.

स्तोत्रमन्त्रमहात्म्येन ।
चान्तरस्थान्धराशयः ॥
सकलाश्च क्षयं यान्ति ।
मन्त्रात्सर्पविषं यथा ॥ २४ ॥

अर्थः— मंत्रापासून सर्पाचें विष जसें तत्काल उतरतें: त्याप्रमाणें जिनेश्वराच्या स्तोत्रमंत्रानें आपलें सर्व दोष नष्ट होतात.

मुक्तिश्रीवनिताकरोदकमिदं पुण्यां-
कुरोत्पादकं । नागेन्द्रत्रिदशेन्द्रचाक्रि-
पदवीराज्याभिषेकोदकम् ॥ सम्य-
ग्ज्ञानचारित्रदर्शनलतासंवृद्धिसम्पा-
दकं । कीर्तिश्रीजयसाधकं जिनवर
स्नानस्य गन्धोदकम् ॥ २५ ॥

अर्थः— जिनेश्वराच्या अभिषेकाचें गन्धोदक असें आहे कीं, मोक्षलक्ष्मीच्या पाणिग्रहणाचें उदक आहे, पुण्यरूपी अंकुरास उत्पादन करणारें आहे, नागेंद्र, देवेंद्र, चक्रवर्ती, राज्य इत्यादि पदांवर अभिषेक प्राप्त करून देणारें आहे, सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, व सम्यक्चारित्ररूपी लतेला वाढविणारें आहे, आणि कीर्ती, संपत्ति विजय व संतोष हीं प्राप्त करून देणारें आहे.

वासुपूज्यस्तथा मल्लि- ।
र्नेमिः पार्श्वश्च सन्मतिः ॥
कुमाराः पञ्च निष्क्रान्ताः ॥
पृथिवीपतयः परे ॥ २६ ॥

अर्थः— वासुपूज्य, मल्लि, नेमि, पार्श्वनाथ आणि महावीर या पांच तीर्थकरांनी कुमारकालीं दीक्षा घेतली. बाकीच्या तीर्थकरांनी राज्यपद अनुभवून शेवटीं दीक्षा घेतली.

वृषभस्य वासुपूज्यस्य ।

नेमेः पर्यङ्कयोगतः ॥
कायोत्सर्गस्थितानां तु ।
सिद्धिः शेषजिनेशिनाम् ॥ २७ ॥

अर्थः— वृषभ, वासुपूज्य आणि नेमि हे तीघे तीर्थंकर पर्यंकासनानें व बाकीचे तीर्थंकर कायोत्सर्गस्थितीनें मोक्षास गेले.

व्यङ्गितां जर्जरां चैव पूर्वमेव प्रतिष्ठिताम् ॥
पुनर्घटितसन्दिग्धां प्रतिमां नो प्रपूजयेत् ॥ २८

अर्थः— व्यंग [हस्त-पाद इत्यादि अवयवांत कांहींतरी न्यूनाधिक असणें] जीर्ण, पूर्वींच प्रतिष्ठित झालेली असून ती छिन्न झाल्यास पुनः घडविलेली अशी प्रतिमा पुजूं नये.

देशजातिकुलोत्पन्नः क्षमासन्तोष-
शीलवान् ॥ मोक्षाभिलाषुको धर्मी
गुरुभक्तो जितेन्द्रियः ॥ २९ ॥ शा-

न्तो दान्तो दयायुक्तो मदमायाविव-
र्जितः ॥ शास्त्ररागी कषायघ्नो दी-
क्षायोग्यो भवेन्नरः ॥ ३० ॥

अर्थः— उत्तम देशांत व उत्तम जाति-कुळांत झा-लेला, क्षमावान्, संतुष्ट चित्ताचा, मोक्षाचा अभिलाषी, धार्मिक, गुरुभक्त, जितेंद्रिय, शांत, गंभीर, दयाळु, निगर्वी, निष्कपटी, शास्त्रावर प्रीति ठेवणारा व कषाय नाश करणारा असा जो पुरुष तो दीक्षा घेण्यास योग्य होय.

अन्धैश्च बधिरैर्मूकै- ।
रङ्गहीनैश्च पङ्गुलैः ॥
अपाणिभिर्निरंगुल्यै- ।
र्जिनदीक्षा विवर्जयेत् ॥ ३१ ॥

अर्थः— आंधळा, बहिरा, मुका, अंगहीन, पांग-ळा, ज्याचे हात अंगुलि वगैरे तुटके आहेत असा इ-त्यादि मनुष्यांस दीक्षा देऊं नये.

मूर्ध्नि निर्गमतश्चैव ।

जीवानां स्वर्गमोक्षयोः ॥
नासायां गमनं यस्य ।
तिर्यग्नरगतिर्भवेत् ॥ ३२ ॥

अर्थः— मस्तकांतून प्राण गेल्यास जीवांस स्वर्ग किंवा मोक्ष गति होते, नाकांतून गेल्यास तिर्यचगति किंवा मनुष्यगति होते.

कर्णे मुखे भवेन्नेत्रे ।
नाभौ वा जीवनिर्गमः ॥
भवेत्तेषां समुत्पत्ति ।
र्मनुष्यदेवजातिषु ॥ ३३ ॥

अर्थः— कान, मुख, नेत्र व नाभि या स्थानांतून प्राण गेल्यास मनुष्य किंवा देवजातीची गति होते.

गुदद्वारं च श्वभ्रतिः ।
र्यग्नरकगतिर्भवेत् ॥
भाषितानि जिनेन्द्रेण ।
स्थानानि जीवितात्मनाम् ॥ ३४ ॥

अर्थः— गुदद्वारांतून प्राण गेल्यास तिर्यंच किंवा नरकगति होते. याप्रमाणें हीं गतीचीं स्थानें जिनानें सांगितलीं आहेत.

प्रातः पञ्चनमस्कृतिर्यति-
पतेर्जैनार्च्चनस्यादृतिः ।
धर्माचाररतिः प्रमादविरतिः
सिद्धान्ततत्त्वश्रुतिः ॥
सर्वज्ञोदितकार्यभावकरणं
साधोश्च वैयावृतिः ।
श्रेयोमार्गसदाविशुद्धिकरणं
श्लाघ्या नराणां स्थितिः ॥ ३५ ॥

अर्थः— प्रातःकाळीं पंचपरमेष्ठींस नमस्कार करणें, जिनेश्वर आणि निर्ग्रंथ गुरु यांचीं पूजा करणें, धर्म आचार पाळण्यांत बुद्धि ठेवणें, प्रमाद सोडणें, सिद्धांतांतील तत्त्वाचें श्रवण करणें, सर्वज्ञ जिनेश्वरानें उपदेशिलेलें कार्य भक्तिपूर्वक करणें, साधुजनांची विपत्ति दूर करणें,

सन्मार्गी शुद्धपणानें चालणें अशा प्रकारची जी मनुष्याची स्थिति, ती श्रे॰ष्ठ होय.

सामायिकावश्यकप्रोषधानि ।
देवार्च्चनस्नानाविलेपनानि ॥
ब्रह्मक्रियादानदयामुखानि ।
भव्य चतुर्मासिकमण्डनानि ॥ ३६ ॥

अर्थः— सामायिक वगैरे आवश्यक क्रिया करणें, प्रोषधोपवास करणें, जिनास अभिषेक पूजा करणें, ब्रह्मचर्य पाळणें, दान देणें, दया करणें, इत्यादि सर्व क्रिया चातुर्मासांत अलंकारभूत होत.

पूजामाचरतां जगत्त्रयपतेः सङ्घा-
र्च्चनं कुर्वतां । तीर्थानामभिवन्दनं
विदधतां जैनं वचः शृण्वताम् ॥ स-
द्दानं ददतां तपश्च चरतां सत्त्वानुक-
म्पाकृताम् । येषां यान्ति दिनानि
जन्म सफलं तेषां सुपुण्यात्मनाम् ॥ ३७ ॥

अर्थ:— जगत्त्रयाचा स्वामी जो जिनेश्वर त्याची पूजा करणें, ऋषि, आर्यिका, श्रावक व श्राविका या चतुर्विध संघाचा सत्कार करणें, सम्मेदशिखर वगैरे तीर्थांची वंदना करणें, जिनवाणी श्रवण करणें, सत्पात्रास दान देणें, तप आचरणें, दुःख पावणाऱ्या जीवांवर दया करणें इत्यादि सत्कृतें करण्यात ज्या पुण्यशाली पुरुषाचे दिवस जातात; त्याचें जन्म सफल होय.

जायन्त तीर्थदेवा हरिहरहरयो मुस-
लीकामदेवा । हेयोपादेयबुद्धिव्रतनि-
यमगणैर्मोक्षमार्गे प्रशस्ताः ॥ योगी-
न्द्रा ध्यानवर्या गणधरनिखराः साध-
यन्त्येव मोक्षं । धर्मं जैनं जनानां
दिशति मुनिगणः काल एवं चतुर्थे ३८

अर्थः - चतुर्थकालांतच या भरतभूमीवर, तीर्थंकर, चक्रवर्ति, वासुदेव, प्रतिवासुदेव, बलराम, कामदेव वगैरे

महापुरुष उत्पन्न होत असतात सद्बुद्धि, व्रत, नियम, तप इत्यादि उपायांनीं मोक्षमार्गांत श्रेष्ठ झालेले योगीजन गणधर वगैरे मुनि मोक्ष साधितात; व तसे भव्य श्रावकासहि सागार अनागार धर्माचा उपदेश करितात.

धर्मः प्रज्वलितस्तपः प्रचलितं सत्यं
च दूरे गतं । पृथ्वी मन्दफला नृपे ऽ-
ति कुटिला लौल्यं गता ब्राह्मणः ॥
लोकाः स्त्रीषु रता स्त्रियोऽतिचपलाः
शास्त्रागमे विप्लवः । साधुः सीदति
दुर्जनः प्रभवति प्रायः प्रविष्टे कलौ ॥

अर्थ: — कलिकालाच्या समयीं, धर्म कमी कमी होऊन शेवटीं नाहींसाच होतो. तप तर कोठें दिसावयाचें नाहीं. सत्यवचन दूर पळून गेलें. पृथ्वी अल्प फल देणारी झाली. राजलोक निर्दय व दुर्मार्गवर्ती झाले. ब्राह्मण धर्मभ्रष्ट झाले. लोक स्त्रीसेवनांत आसक्त झाले. स्त्रिया चपल झाल्या. शास्त्रागमाचा ऱ्हास झाला. सत्यमार्गी

चालणारा साधु कष्ट पावतो व दुर्जनाचाच विजय होतो. असा स्वभाव कलिकालाचा आहे.

तीर्थेशाश्चक्रवर्तिप्रतिहरिहरयो नार-
दा नीलकण्ठा । मन्दाराः कामधेनुः
सुरविबुधगणा दक्षिणावर्त्तशङ्खाः ॥
चिन्तारत्नानि भद्रद्विपमृगपतयश्च-
न्दनं राजहंसः । शुक्लध्यानं सुविद्या
गगनगमनिका पद्मिनी नो कलौ च ॥

अर्थः— तीर्थंकर, चक्री, वासुदेव, प्रतिवासुदेव, कामदेव, नारद, मंदार नाम कल्पवृक्ष, कामधेनु, दक्षिणेकडून वर्तुलाकार असा शंख, चिंतामणि, भद्रगज, सिंह, उत्कृष्ट चंदन, राजहंस, शुक्लध्यान, आकाशगमन, पद्मिनी स्त्री इत्यादि सर्व या कलिकालांत असत नाहीत.

भयदाक्षिण्यकीर्तिश्च ।
लज्जा आशा तथैव च ॥
पञ्चाभिः पञ्चमे काले ।

जैनो धर्मः प्रवर्त्तेत ॥ ४१ ॥

अर्थः— भीति, दाक्षिण्य (भीड-मुरवत)कीर्ति, लज्जा, अशा इत्यादि कारणांनी या पंचमकाळीं जैनधर्म चालू असेल. केवळ आपलें कर्तव्य असें समजून धर्ममार्गी प्रवृत्त होणारे क्वचितच आढळतील.

धन्या भारतवर्षसम्भवजना येऽत्रा-
पि काले कलौ । निस्तीर्थेश्वरकेवली-
निरवधौ भ्रस्यन्मनःपर्यये ॥ त्रुट्यत्सू-
त्रविशेषसम्पदि भवद्दौर्गत्यदुःखा-
पादि । श्रीजिनेन्द्रवचोऽनुरागवशतः
कुर्वीत धर्मोद्यमम् ॥ ४२ ॥

अर्थः— जेथें; तीर्थंकर, केवली, अवधिज्ञानी व गणधर या पैकी कोणीहि उपदेशदाता नाहीं, उत्तमप्रकारें शास्त्र जाणणारा कोणी नाहीं, अशा या कलिकाळांत सुद्धां, अजून जे भारतवासी लोक या संसाराच्या यातनेंत अनेक प्रकारची दुःखें व विपत्ति सहन करूनहि

श्रीजिनेश्वराच्या वचनावर अनुराग करून धर्म मार्गानें चालतात, ते मोठे धन्य होत.

श्रीसर्वज्ञपदाब्जसेवनमतिः शास्त्रा-
गमे चिन्तना । तत्त्वातत्त्वविचारणे
निपुणता सत्संयमो भावना ॥ स-
म्यक्त्वे रचना अघोपशमता जीवा-
दिके रक्षणा । सत्सागारिगुणा
जिनेन्द्रकथिता येषां प्रसादाच्छि-
वम् ॥ ४६ ॥

अर्थः— श्रीजिनेश्वराच्या पदकमलाच्या सेवेंत बुद्धि ठेवणें, शास्त्रागमांचा विचार करणें, तत्त्वात्त्वांच्या विचारांत तत्पर असणें, उत्तम संयमाची भावना करणें, सम्यक्त्व प्राप्त करून घेणें, पापाचा नाश करणें, प्राणिमात्रांचें रक्षण करणें इत्यादि सर्व गुण उत्तम श्रावकाचे होत. या गुणांच्या प्रसादानें शिव सुखाची प्राप्ति होते. हे गुण श्रीजिनानें सांगितलेले आहेत.

अम्भोबुद्बुदसंनिभा तनुरियं श्रीरि-
न्द्रजालोपमा । दुर्वाताहतवारिवाह-
सदृशाः कान्तार्थपुत्रादयः ॥ सौख्यं
वैषयिकं तरंगतरलं मत्तांगनापांगत- ।
स्तस्मादेतदुपप्लवाप्तिविषये शोकेन
किं किं मुदा ॥ ४४ ॥

अर्थः — हा देह पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें अस्थिर आहे, लक्ष्मी इंद्रजाला- [गारुड विद्या] प्रमाणें क्षणिक आहे. भयंकर वायूच्या सपाट्यानें नाश पावणाऱ्या मेघाप्रमाणें स्त्री, पुत्र, अर्थ वगैरे क्षणिक आहेत, तारुण्याच्या भरास पावलेल्या स्त्रियांच्या कटाक्षापासून प्राप्त होणारें विषयसुख जलतरंगाप्रमाणें चंचल, तेव्हां अशा प्रकारच्या या अस्थिर पदार्थांच्या प्राप्तीपासून आनंद कां मानावा? व यांच्या वियोगापासून दुःख तरी कां मानावें?

यो धर्मलीनो जितरागरोषो ।
विद्याविनीतो न परोपतापी ॥

स्वदारतुष्टः परदारवर्जी ।
न तस्य लोके भयमस्ति किञ्चित् ॥ ४५ ॥

अर्थः—जो धर्ममार्गात लीन झाला आहे, ज्याला रागद्वेष नाहीं, जो विद्वान् असून नम्रतेनें वागतो, दुसऱ्यास कोणत्याहि प्रकारें त्रास देत नाहीं, स्वस्त्रीच्या ठिकाणीं संतुष्ट असतो, व परस्त्री सेवीत नाहीं: अशा मनुष्यास या जगांत यत्किंचित्हि भय नाहीं.

एकाग्रचित्तस्य दृढव्रतस्य ।
पञ्चेन्द्रियप्रीतिनिवर्त्तकस्य ॥
अध्यात्मयोगे गतमानसस्य ।
मोक्षो ध्रुवं नित्यमहिंसकस्य ॥ ४६ ॥

अर्थः— जो एकाग्रचित्तानें वागतो, ज्याचीं व्रतें दृढ आहेत, ज्यानें पंचेंद्रिय–विषयावरील प्रीति सोडिली आहे, अध्यात्म जाणण्यास ज्याचें मन उद्युक्त असतें व जो कधींच हिंसा करीत नाहीं; अशा मनुष्यास मोक्ष होणारच.

वन्हिस्तस्य जलायते जलनिधिः
कुल्यायते तत्क्षणात् । मेरुस्तस्य शि-
लायते मृगपतिः सद्यः कुरङ्गायते ॥
व्यालो माल्यगुणायते विषरसः पी-
यूषवर्षायते । यस्यांगेऽखिललोकव-
ल्लभतमं शीलं समुल्लासते ॥ ४७ ॥

अर्थः— सर्व जगांत श्रेष्ठ असें शील ज्याच्या ठि-कार्णी आहे, अशा पुरुषास अग्नि जलाप्रमाणें शीतल होतो. आडवा आलेला समुद्र लहानशा नदीप्रमाणें होतो. मेरुपर्वत एका लहानशा दगडा सारखा होतो. सर्प पुष्पमालेप्रमाणें होतो. विषरसाचें अमृत होतें. असा शीलाचा महिमा आहे.

सुखशय्यासनं वस्त्रं ताम्बूलं स्नानमण्डनम्
दन्तकाष्ठं सुगन्धं च ब्रह्मचर्यस्य दूषणम् ४८

अर्थः— सुखशय्या (नरम बिछाना) उत्तम वस्त्रें, तांबूल, स्नान, अलंकार, दांत घांसणें, व अत्तर हीं

सर्व ब्रह्मचर्यास दूषणें होत.

सम्यक्त्वं जिनपूजनं च सुतपो दानं दया संयमं । चारित्राचरणं त्रयोदशविधं सम्यक्प्रकारोद्यमम् ॥ पञ्चज्ञानमतिः कषायविजयं षड्द्रव्यमर्थान्वितं । एते वै जिनभाषिताः शुभकराः पुण्यास्रवा ह्यास्रवाः ॥ ४९ ॥

अर्थः— सम्यक्त्व पाळणें, जिनपूजा करणें, उत्कृष्ट तप करणें, दान देणें, दया करणें, संयम पाळणें, पांच प्रकारचें ज्ञान संपादन करण्याची बुद्धि ठेवणें, क्रोधादि विकार जिंकणें, सहा द्रव्यें नऊ पदार्थ इत्यादि जाणणें, हे सर्व पुण्य येण्याचे मार्ग आहेत.

हेयोपादेयवैकल्यं न यो वेत्ति हिताहितम् । निमग्नो विषयाक्षेषु बहिरात्मा स उच्यते ॥ ५० ॥

अर्थः— बरें, वाईट, हित, अहित वगैरे ज्यास कळत

नसून केवळ जो विषयांच्या ठिकाणीं निमग्न असतो तो बहिरात्मा होय.

देवशास्त्रगुरूणां च विचारज्ञाः सदृष्टयः ॥
दानपूजाव्रताचारदयावन्तोऽन्तरात्मकाः ॥ ५१ ॥

अर्थः-- देव, शास्त्र, गुरु. यांचा विचार जाणणारे सम्यग्दृष्टि. दान, पूजा, व्रत व दया इत्यादि सद्गुण पाळणारे असे जे श्रावक ते व्यवहार नयानें अंतरात्मा होत.

ध्यानारूढं समरसयुतं मोक्षमार्गे प्र-
विष्टं । शान्तं दान्तं सुयतिसहितं
योगवन्हौ हुताक्षम् ॥ धर्मापन्नं स्मर-
मदपदं जीवितव्ये निममं । तत्सर्वं
ज्ञास्त्रिभुवनगुरवा ह्यन्तरात्मानमाहुः ॥ ५२ ॥

अर्थ — धर्मध्यानाप्रत पोंचलेला, समरसानें युक्त अर्थात् सर्वत्र समता भाव ठेवणारा, ज्ञानी, योगरूपी अग्नीत पंचेंद्रियांस जाळिलेला. धर्मवान्, निगर्वी, जीव-

तत्त्व जाणण्यांत तल्लीन झालेला, असा जो योगी तो निश्चय नयानें अंतरात्मा होय. असें त्रिभुवनपूज्य अशा सर्वज्ञ जिनेश्वरानें सांगितलें आहे.

हतदुर्घातिकर्माणः प्रातिहार्यविभू-
षिताः त्रिजगन्नाथसंसेव्यास्ते मताः
सकला जिनाः ॥ ५३ ॥

अर्थः— ज्यांनी चार घातिकर्मांचा नाश केला आहे; अशोकवृक्ष, सुरपुष्पवृष्टि इत्यादि आठ महाप्रातिहार्ये ज्यांस प्राप्त झालीं आहेत अर्थात ज्यांना केवलज्ञान प्राप्त होऊन तीन्ही जगांच्या इंद्रांस जे पूज्य झाले आहेत ते सकल जिन होत. (परमात्म्याचे प्रकार दोन? एक सकल परमात्मा व दुसरा निष्कल परमात्मा. जिनास सकल परमात्मा आणि सिद्धास निष्कलपरमात्मा म्हणतात)

कर्माष्टकविनिर्मुक्तं ।
सम्यक्त्वादिगुणान्वितम् ॥
त्रैलोक्यशिखरारूढं ।

वदन्ति निष्कलं जिनाः ॥ ५४ ॥

अर्थः— अष्टकर्मांपासून मुक्त होऊन सम्यक्त्व वगैरे अष्ट गुणांनीं युक्त व त्रैलोक्यशिखराप्रत पोंचलेला अर्थात् जो सिद्धपरमेष्टी तो निष्कल परमात्मा होय.

यतीनां श्रावकाणां च ।
शिष्याणां चाल्पमेधसाम् ॥
न वाचनीयं पुरतः ।
सिद्धान्ताचारपुस्तकम् ॥ ५५ ॥

अर्थः— यति होवो, श्रावक होवो, अथवा शिष्य होवो, ते जर मंदबुद्धीचे-असतील तर त्यांच्या पुढें सिद्धांताचार पुस्तक वाचूं नये.

नो दुःकर्मप्रयासो न कुयुवतिसुतस्वा-
मिदुर्वाक्यदुःखं । राजादौ न प्रणा-
मोऽशनवसनधनस्थानचिन्ता न चैव ॥
ज्ञानाप्तिर्लोकपूजा प्रशमसुखरतिः

प्रेत्य मोक्षाद्यवाप्तिः । श्रामण्येऽमी
गुणाः स्युस्तदिह सुमतयस्तत्र यत्नं
कुरुध्वम् ॥ ५६ ॥

अर्थः— दुष्कर्मांत प्रवृत्ति होत नाहीं; दुराचार करणारी स्त्री, पुत्र, मालकाचे दुःशद्ब इत्यादिकांपासून दुःखें भोगण्याचा प्रसंग येत नाहीं; राजादिकांस नमस्कार करण्याची गरज नाहीं; खाणें, पिणें वस्त्र, धन, धान्य, घर इत्यादि पदार्थांची चिंता वहावी लागत नाहीं; ज्ञान, व लोकांत मानमान्यता हीं प्राप्त होतात; प्रशमसुखाचे ठायीं प्रीति उत्पन्न होते; परलोकसुख व मोक्ष हीं प्राप्त होतात; या प्रमाणें मोठमोठे गुण जिनदीक्षेमध्यें आहेत. याकरितां हे बुद्धिवंतांनो तुम्ही जिनदीक्षा घेण्याचा प्रयत्न करा.

बुद्धेः फलं तत्त्वविचारणं च ।
देहस्य सारं व्रतधारणं च ॥
वित्तस्य सारं किल पात्रदानं ।

वाचः फलं प्रीतिकरं जनानाम् ॥ ५७ ॥

अर्थः— तत्त्वाचा विचार करणें हें ज्ञान प्राप्त झाल्याचें फळ; व्रतें पाळणें हें नरदेह प्राप्त झाल्याचें फळ; सत्पात्रीं दान देणें हें द्रव्य प्राप्त झाल्याचें फळ आणि हित, मित, सत्य, व प्रिय भाषण करणें हें वाचेचें फळ होय.

असुरसुरनराणां यो न भोगेन तृप्तः ।
कथमपि मनुजानां तस्य भोगेन तृप्तिः ॥
जलनिधिजलपानैर्यो न पानेन तृप्तः ।
स्तृणशिखरगताम्भस्तस्य पाने म तृप्तः ॥

अर्थः— जो देव दैत्य चक्रवर्ती इत्यादि पदांवर असतांना तेथील अमर्याद विषयभोगांनीं तृप्त झाला नाहीं; तो या मानवांच्या अल्पभोगानें तृप्त होईल काय? ज्याला समुद्रांतील जल पान करून तृप्ति झाली नाहीं तो गवताच्या अग्रभागावरील अल्प अशा जलबिंदूनें तृप्त होईल काय; कधींच होणार नाहीं.

यावत्स्वस्थतरं कलेवरमिदं यावच्च
दूरे जरा । यावच्चेन्द्रियशक्तिरप्रति-
हता यावत्क्षयो नायुषः ॥ आत्मश्रे-
यसि तावदेव विदुषा कार्यः प्रयत्नो
महान् । आदीप्ते भवने हि कूपख-
ननं प्रत्युद्यमः कीदृशः ॥ ५९ ॥

अर्थः- जो पर्यंत हें शरीर स्वस्थ आहे, अद्याप वृद्धापकाळ आला नाहीं, इंद्रियांच्या ठिकाणीं चांगली शक्ति आहे, आयुष्याचा क्षय झाला नाहीं, तों पर्यंत शहाण्या मनुष्यानें आत्महित साधण्यास मोठा प्रयत्न करावा. कारण, एकाएकीं मरण आल्यावर अथवा वृद्धापकाळीं, आत्महिताचीं साधनें होऊं शकत नाहींत. पहा की, घरास आग लागून तें पेटलें असतांना पाण्याकरितां विहीर खोदण्याचा यत्न कसला?

अभ्रच्छाया तृणाद्वह्निः पराधीनं च
यत्सुखम् ॥ अज्ञानेषु च वैराग्यं क्षि.

प्रमेव विनश्यति ॥ ६० ॥

अर्थः– मेघाची सांवली, गवताचा विस्तव, दुसऱ्याच्या अधीन असलेलें सुख, अज्ञानातील वैराग्य ही सर्व, फार वेळ टिकत नाहीत.

शूराश्च धनिनः सन्ति ।
गायका बहवो नटाः ॥
पृथिव्यां विरला ज्ञेया ।
ज्ञानिनो मोक्षमार्गगाः ॥ ६१ ॥

अर्थः— शूरवीर, श्रीमंत, गवयी, नट वगैरे या जगांत पुष्कळ आहेत. पण, ज्ञानी असून मोक्षमार्गी चालणारे सत्पुरुष मात्र क्वचितच आढळतात.

धूलीधूसलितं विमुक्तवसनं पर्यङ्कमुद्रागतं । शान्तं निर्वचनं निमीलितदृशं तत्त्वोपलम्भे सति ॥ उत्कीर्णं दृषदीव मां वनभुवि भ्रान्तो मृगाणां गणः । पश्यत्युद्गतविस्मयो यदि तदा

माहग्जनः पुण्यवान् ॥ ६२ ॥

अर्थः— ज्यानें अंगावरील वस्त्रें टाकून दिलीं आहेत, ज्यांच्या सर्वांगावर धुरळा बसला आहे, जो पर्यंकमुद्रा धरून व मौनव्रत धारण करून शांत होऊन बसला आहे असा मी तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीच्या वेळीं डोळे मिटून अरण्यांत बसलों असतांना तेथील श्वापदांच्या समुदायास दगडांत कोरलेल्या चित्रासारखा दिसून ते जेव्हां मला पाहून आश्चर्यचकित होतील, त्यावेळीं माझ्यासारखा मनुष्य धन्य होय.

विना गुरुभ्यो गुणवान्नरोऽपि ।
धर्मं न जानाति विचक्षणोऽपि ॥
आकर्णदीर्घोज्ज्वललोचनोऽपि ।
दीपं विना पश्यति नान्धकारे ॥ ६३ ॥

अर्थः— मनुष्य कितीहि बुद्धिवान् असला, तरी त्यास गुरूशिवाय धर्म कळणार नाहीं. याला उदाहरण—कानापर्यंत लांब व पाणीदार अशा नेत्रांचा जरी मनुष्य

असला, तरी अंधकारांत त्यास दिव्याच्या सहायावांचून कांहींच दिसणार नाहीं.

सत्सङ्गः सर्वकालं सुललितवचनं
सादरत्वं स्वधर्मे। सङ्कष्टे स्वान्तदार्ढ्यं
सुतयुवतिसुखे स्तोकसंसक्तभावः ॥
सन्तोषः स्वल्पलाभात्सकलजनहिता
संश्रिता स्वामिसेवा । सामर्थ्ये सौ-
म्यवृत्तिः सदयहृदयता संसृतेः स्या-
द्धेतुः ॥ ६४ ॥

अर्थः--- निरंतर सज्जनाची संगत करणें, मधुर भाषण करणें, जिनधर्मी आदर ठेवणें, संकट समयीं चित्त स्थिर ठेवणें, स्त्रपुत्रादिकांच्या सुखांत फार आसक्त न होणें, थोडक्या लाभानेंहि संतुष्ट असणें, सर्वजनांस हितकारक अशी जिनाची सेवा करणें, पराभव करण्याचें सामर्थ्य असूनहि सौम्यवृत्तीनें असणें, दयाभाव ठेवणें हीं सर्व संसारापासून मुक्त होण्याचीं कारणें होत.

सम्यक्त्वोत्तमहस्तिमस्तकगतः स-
ज्ञानकेतुव्रजो । नानाशीलगुणव्रतो-
रुपृतनः स्वाध्यायतुर्यध्वनिः ॥ भा-
स्वत्संवरनिर्जरोरुकवचो ध्यानादितीक्-
ष्णायुधः । भव्यो धर्ममहानृपो बुध-
भटैः स्वर्मोक्षसौख्यप्रदः ॥ ६५ ॥

अर्थः— सम्यक्त्वरूपी हत्तीवर बसलेला, ज्ञानरूपी ध्वजानें शोभणारा, चारित्र रूपी सैन्यासह असणारा, स्वाध्यायरूपी दुंदुभि, संवर-निर्जरा रूपी कवच, ध्यानरूपी तीक्ष्ण आयुध ही ज्यानें धारण केलीं आहेत असा हा स्वर्गमोक्षादिसुख देणारा धर्मरूपी महाराजा विद्वान् रूपी शूरपुरुषाकडून पूजिला जातो.

समाप्त.